महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

राज्यात मुलांच्या अपहरणाच्या प्रमाणात वाढ होत असल्याबाबत

(१) ३७६९ (२३-०३-२०२०). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय गुन्हे विभागाच्या अहवालानुसार सन २०१८ मध्ये महाराष्ट्रात सर्वात जास्त १०६२३ अल्पवयीन मुला-मुलींच्या अपहरणाचे गुन्हे नोंद झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दररोज तीस मुलांचे अपहरण केले जात असून यात मुलींचे प्रमाण ७२ टक्के असल्याचेही या अहवालातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील मुला-मुलींच्या अपहरणाचे प्रमाण कमी करून मुलांना सुरक्षित जीवन जगता यावे यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) :(१) व (२) होय.

सन २०१८ चा राष्ट्रीय अपराध रिकॉर्ड ब्यूरोच्या अहवालानुसार महाराष्ट्रारात अल्पवीयन मुला-मुलींचे अपहरण व अपनयन (Kidnapping and Abduction of Children) चे एकुण १०११७ गुन्हे दाखल असुन १०६२३ बळीत आहेत. यामध्ये ७६३७ अल्पवयीन मुलींचे अपहरण/अपनयन झाल्याचे अहवालावरुन दिसुन येते; त्यानुसार मुलींचे प्रमाण टक्केवारी ७१.८९ टक्के एवढे आहे.

(३) बालकांचे अपहरणाचे घडणारे गुन्हे रोखण्याबाबत करण्यात आलेल्या प्रमुख उपाययोजना खालीलप्रमाणे :

१) गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन परिपत्र क्र. सीआरटी ०९१२/प्र.क्र.५४/पोल-१३, दि. १०/११/२०१४ अन्वये १८ वर्षाखालील हरविलेल्या मुलांच्या बाबतीत, थेट अपहरणाचा गुन्हा (FIR) दाखल करण्याबाबत व गुन्हयाच्या तपासाबाबत तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत

२) बालकांविरूध्दच्या गुन्हयांच्या तपासासंदर्भात मार्गदर्शिका व हरविलेल्या बालकांसंदर्भात आदर्श कार्यप्रणाली (SOP) सर्व पोलीस घटकांना वितरीत करण्यात आली आहे.

३) बालकांवरील अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी शाळा, कॉलेजच्या परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना व मार्गदर्शन करण्यात येत असतात.

४) केंद्रीय गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांचे तर्फे www.trackthemissingchild.gov.in या संकेतस्थळाव्दारे प्रत्येक पोलीस घटकातील अधिकारी/कर्मचारी यांना कार्यशाळा आयोजित करून प्रशिक्षित करण्यात आले आहे.

५) महिला अत्याचार प्रतिबंध विभाग, गु.अ.वि. म.राज्य, पुणे कडून ‘महिला व बालकांवरील अत्याचार रोखणेकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती पुस्तिका प्रकाशीत करण्यात आली आहे.

६) संकटात सापडलेल्या बालकांसाठी १०९८ ही टोल - फ्री हेल्पलाईन राज्यात कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

७) बालकांचे लैंगिक छळास प्रतिबंध अधिनियम, २०१२ ची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता, बलात्कारासारख्या गंभीर गुन्हयांचा तपास जलद गतीने व्हावा तसेच बलात्कारासारख्या गुन्हयांना आळा बसावा याकरिता तसेच छेडछेड व विनयभंगाच्या घटना रोखण्यासाठी सर्व घटकप्रमुखांना मार्गदर्शन व सुचना परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत.

८) अनैतिक मानवी वाहतुकीस प्रतिबंध करण्याकरिता १२ AHTU ची स्थापना करण्यात आलो आहे.
९) राज्यातील पोलीस स्टेशनमध्ये एक पोलीस अधिकारी हा बालकल्याण अधिकारी म्हणुन नेमण्यात आलेला आहे. सदर अधिकारी बालकांसंबधी पोलीसांच्या कार्यवाहीत समन्वय साधण्याचे काम करतात. तसेच सर्व ४८ पोलीस घटकांचे मुख्यालयात विशेष बाल पोलीस पथके स्थापन करण्यात आलेली आहेत.
१०) राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोग, नवी दिल्ली यांनी पाठविलेली Standard Operation Procedure बालकांचे लैंगिक शोषण, बालकांचे अपहरण, बालकांना पळवून नेणे, बालकांचा मृत्यू यासंदर्भात कोणती कार्यपध्दती अवलंबवावी याबायत सर्व पोलीस घटकांना महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयातून सूचित केले आहे.
११) बालकांचे लैंगिक छळास प्रतिबंध अधिनियम, २०१२ ची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या अनुषंगाने जिल्हा स्तरावर व आयुक्तालय स्तरावर "विशेष कृती दल" गठीत करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.
१२) बालकांचे हक्क व सुरक्षितता या संदर्भात जनजागृती सप्ताह ची मोहिम राबवून सदर मोहिमेत राज्यातील विविध शाळा, महाविद्यालये यांना भेटी देवून बालकांचे हक्क व सुरक्षिततेबाबत जागजागृती करण्यात आली.
(४) प्रश्न उद्भवत नाही

संचयनी सेव्हिंग्ज ॲण्ड इन्व्हेस्टमेंट इंडीया लिमिटेड या कंपनीने केलेली फसवणूक

(२) ६२११ (२०-०४-२०२०). श्री.नितेश राणे (कणकवली): सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कणकवली आणि सावंतवाडी तालुक्यातील २७,००० शेतकरी, मोलमजुर आणि शिक्षक यांची संचयनी सेव्हिंग्ज ॲण्ड इन्व्हेस्टमेंट इंडीया लिमिटेड या कंपनीने मोठ्या परताव्याची आमिषे दाखवून कोणताही परतावा न देता १८ वर्षापूर्वी लाखो रुपयांची फसवणूक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याचप्रकारे राज्यातील मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नागपूर कोल्हापूर, नाशिक. सांगली, सातारा इत्यादी जिल्ह्यातील नागरिकांची फसवणूक झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागरिकांनी तक्रारी केल्यानंतर या कंपनीची चौकशी करण्यात आली आहे काय, असून अद्याप चौकशी पूर्ण झाली नसल्याने दोषी कंपनीचे अधिकारी उघडपणे राज्यात फिरत असून गुंतवणूकदारांचे पैसेही परत मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चौकशीची सद्य:स्थिती काय आहे आणि किती कालावधीत चौकशी पूर्ण होण्याची अपेक्षा आहे?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) होय.
(२) होय.
(३) व (४)
सिंधुदुर्ग जिल्हयात सदर प्रकरणातील ७ आरोपींनी संगनमताने आपल्या आर्थिक फायदयासाठी ठेवीदारांना ठेवीची मुदत संपल्यानंतर रक्कम परत करणे आवश्यक असतांना व तसे कायदेशीर बंधन असतांना एकुण २७०३७ खातेदारांची रु.६,७६,९८,४३४/- इतक्या रक्कम फसवणूक केली म्हणून सावंतवाडी पोलीस ठाणे येथे गुरनं. ४०/२००२ भादंवि कलम ४२०, ३४, १२०(ब) सह एमपीआयडी अधिनियम १९९९ चे कलम ३ सह रिझर्व्ह बँकेचे १९३४ चे कलम ५४-बी, ६ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
सदर गुन्हयात एकूण ७ आरोपी निष्पन्न झालेले असून त्यापैकी ३ आरोपींना अटक केली आहे. तसेच उर्वरीत १ आरोपीस अटकपूर्व जामीन, १ आरोपीचे कंपनीविरुध्द दावा दाखल केलेला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने त्यास अटक करण्यात आलेली नाही. उर्वरीत २ आरोपींचा शोध घेणे चालू आहे.
तसेच इतर जिल्हयातील नागरिकांची सदर कंपनीकडून फसवणूक झाल्याप्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने गुन्हे दाखल असून प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

फलटण (जि.सातारा) येथील दोन युवकांनी सैन्यामध्ये भरती करण्याचे आमिष दाखवून युवकांची फसवणूक केल्याबाबत

(३) १२९६५ (१३-०९-२०२०). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फलटण (जि.सातारा) येथील दोन युवकांनी महाराष्ट्रातील अनेक युवकांना सैन्यामध्ये भरती करण्याचे आमिष दाखवून त्यांची आर्थिक फसवणूक केल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फसवणूक झालेल्या युवकांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार अर्ज देऊन सुद्धा संबंधित पोलीस स्टेशनने तक्रार दाखल करून घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या फसवणूकीबाबत तसेच तक्रार दाखल करून घेण्यास टाळाटाळ करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) माहे जून, २०२० मध्ये सातारा जिल्हयामध्ये सदर प्रकरणी कोणतीही बाब निदर्शनास आली नाही. तथापि डिसेंबर, २०१९ ते एप्रिल, २०२१ या कालावधीत एकूण १० निनावी तक्रारी अर्ज पोलीस अधीक्षक, सातारा यांचे कार्यालयास प्राप्त झाले होते.

(२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणाच्या संदर्भाने जानेवारी, २०२० मध्ये फलटण शहर पोलीस ठाणे, जि. सातारा येथे गु.र.नं. २४/२०२० भा.दं.वि. कलम ४२० प्रमाणे एका आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले असल्याने तसेच माहे जानेवारी, २०२० मध्ये पुणे जिल्हयातील भिगवण पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३०४/२०२० भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४६९, ४७०, ४७२, ५०६, ३४ प्रमाणे २ आरोपीविरुध्द गुन्हा दाखल झाल्याने पोलीस अधीक्षक, सातारा यांचेकडील उपरोक्त नमुद निनावी अर्ज निकाली काढण्यात आले.

राज्यात सदर प्रकरणी पोलीस विभागास प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तात्काळ चौकशी करुन वेळीच गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

औरंगाबाद शहर तसेच जिल्ह्यातून महिलांचे बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढत असल्याबाबत

(४) १३६३३ (१३-०९-२०२०). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहर तसेच जिल्ह्यातून गेल्या दोन वर्षात ११५० महिला बेपत्ता झाल्याचे निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोर-गरीब, विधवा आणि निराधार महिलांना काम देण्याचे आमिष दाखवून परराज्यात नेवून त्यांची विक्री करणाऱ्या टोळ्या सक्रिय आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद शहर तसेच जिल्ह्यातील महिलाच्या त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन या प्रकरणी तातडीने लक्ष घालून दोषींवर कारवाई करणार आहे काय?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :(१) गेल्या दोन वर्षात (सन २०१९, २०२०) औरंगाबाद शहरामधून १२५२ महिला बेपत्ता झालेल्या असून, त्यापैकी १०९९ महिलांचा शोध घेण्यात आला आहे. औरंगाबाद ग्रामीण भागातून सदर कालावधीत ६७१ महिला बेपत्ता झाल्या होत्या त्या पैकी ६५४ महिलांचा शोध घेण्यात आला आहे.

(२) औरंगाबाद शहर व ग्रामीण भागात गरीब, विधवा आणि निराधार महिलांना काम देण्याचे आमिष दाखवून परराज्यात नेवून त्यांची विक्री करणाऱ्या टोळी सक्रिय असल्याचे अढळून आलेले नाही.

(३) हे खरे नाही,
औरंगाबाद शहर तसेच जिह्यातील ग्रामीण भागामध्ये महिलांच्या सुरक्षतेसाठी खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.
१) औरंगाबाद शहर कार्यक्षेत्रातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये महिला सुरक्षा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. तसेच शहरामध्ये दोन महिला दामिनी पथके, दोन महिला पेट्रोलींग पथकांची स्थापना करण्यात आली आहे.
२) औरंगाबाद ग्रामीण कार्यक्षेत्रात महिलांच्या सुरक्षेसाठी दोन स्वतंत्र दामिनी पथके व भरोसा सेल ची स्थापना करण्यात आली आहे.
३) औरंगाबाद शहरामध्ये महिलांच्या सुरक्षेकरीता महिला हेल्पलाईन (क्रमांक १०९१) कार्यान्वित करण्यात आली आहे.
४) महिलांच्या तक्रारी प्राप्त होताच त्वरीत दोषींविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्ह्यात अवैधरित्या शस्त्रांची आवक होत असल्याबाबत

(५) ३२२६८ (०५-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यात पोलिसांनी तलवारी, गुप्ती, सुरे या सोबतच १० अवैध पिस्तुल जप्त केल्याचे माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोठ्या प्रमाणावर प्राणघातक शस्त्रे कुठून येत आहेत याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,
(३) असल्यास, उक्त घटना पुन्हा घडू नये याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) होय.
बुलढाणा जिल्हयात पोलीसांकडून ८ पिस्टल, १० तलवारी व १ चाकू एवढी अवैध हत्यारे पकडण्यात आलेली आहेत.
(२) सदरची शस्त्रे आरोपी यांनी ही सीमेलगत राज्यातून आणत असल्याचे तसेच तलवारी व चाकू नांदेड येथुन व काही इतर व्यक्तींकडून बनवुन घेत असल्याबाबत प्राथमिक तपासामध्ये दिसून आले आहे.
(३) याकरीता, जिल्हयामध्ये वेळोवेळी विशेष नाकाबंदी चे आयोजन करुन नाकाबंदी मध्ये रेकॉर्डवरील व इतरही गुन्हेगारांची घरझडती घेण्यात येवुन चेक करण्यात येते. तसेच जिल्हा सीमेवर व जिल्हाअंतर्गत सुध्दा चेक पॉईंट लावुन संशईत वाहने, संशईत आरोपी चेक करण्यात येतात. तसेच जिल्हयामध्ये ऑपरेशन ऑलआऊट मोहिम राबवुन सदर मोहिमेमध्ये संशईत/सराईत गुन्हेगारांवर पाळत ठेवुन त्यांची व त्यांचे घराची व संशईत ठिकाणांची झडती घेण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) शहरी व ग्रामीण भागात वारंवार विज पुरवठा खंडीत होत असल्याबाबत

(६) ३२४४४ (१२-०१-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) शहरी व ग्रामीण भागात ठिकठिकाणी बसविण्यात आलेले कमी क्षमतेचे ट्रान्सफार्मर, उच्च व लघुदाबाच्या वीज वाहिन्या जवळपास २५ ते ३० वर्षापूर्वी टाकण्यात आल्या असून पावसाळयात ठिकठिकाणी होणारे शॉर्ट सर्किट तसेच पक्षी बसून वीज वाहिन्या बंद पडणे या कारणास्तव वीज पुरवठा वारंवार खंडीत होत असल्याने नागरिकामध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत विभागाच्या अधिका-यांकडे पनवेल तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागात ठिकठिकाणी मोडकळीस आलेले सिमेंटचे खांब व जीर्ण झालेल्या विदयुत तारा बदलण्याची वारंवार मागणी करूनसुद्धा कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधीना स्थानिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पनवेल शहरातील वीज पुरवठा सुरळीत होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
पनवेल तालुक्यातील विशेषत: शहरातील उपरीतार वाहिन्या ३० वर्षाहुन जुन्या झाल्या कारणाने वादळवाऱ्यात झाडांच्या फांदया पडून वीज पुरवठा खंडीत होण्याच्या घटना पावसाळयात घडून येत असतात.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.
पनवेल तालुक्यातील विशेषत: शहरातील उपरीतार वाहिन्या ३० वर्षाहुन जुन्या झाल्या कारणाने वादळवाऱ्यात झाडांच्या फांदया पडून वीज पुरवठा खंडीत होण्याच्या घटना पावसाळयात घडून येत असतात. पनवेल शहरात अखंडित वीज पुरवठा करण्याच्या उद्देशाने या लघुदाब व उच्चदाब वाहिन्याचे भुमिगत वाहिन्यांत रुपांतर करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मंत्री (ऊर्जा) यांना दि. ०२.०२.२०२१ च्या पत्रान्वये लेखी निवेदन दिले आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने पनवेल शहरातील सुशोभिकरण करण्यासाठी उपरीतार लघुदाब व उच्चदाब वाहिन्याचे भुमिगत वाहिन्यांत रुपातंर करण्याकरिता महावितरण कडून रु. १५१.५३ कोटींचा डीपीआर बनविण्यात आला असून सदर डीपीआर १.३% डीडीएफ योजनेअंतर्गत समाविष्ट करुन पनवेल महानगरपालिकेकडे सादर करण्यात आला आहे. तसेच नवीन रोहित्रे, खांब बदल करणे, रोहीत्र क्षमता वाढ इ. कामे प्रस्तावित केंद्र शासनाच्या आरडीएसएस योजनेत प्रस्तावित करण्यात आली आहेत जेणेकरुन पनवेल शहराला सुरळीत वीजपुरवठा होऊ शकेल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

महावितरण वीज कंपनी आर्थिक संकटात असल्याबाबत

(७) ३२४५१ (१२-०१-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यातील २ कोटी ८७ लाख ग्राहकांना वीज पुरवठा करणारी महावितरण ही शासकीय कंपनी सुमारे ७४ हजार कोटी रुपयाच्या थकबाकीमुळे आर्थिक संकटात असल्याची बाब दिनांक १४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मंत्रालयात झालेल्या बैठकीत निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरण मंडळाची सातत्याने वाढती थकबाकी रोखून आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) कृषी ग्राहकांच्या थकबाकी वसुलीसाठी विशेष कृषी योजना शासनाच्या मान्यतेनुसार माहे सप्टेंबर-२०२० पासून चालू करण्यात आलेली आहे. थकबाकी वसुलीसंदर्भात जून-२०२१ पासून वीज बिलाच्या वसुलीची विशेष मोहीम राबविण्यात येत असून त्याचा विभागीय स्तरापर्यंत साप्ताहीक आढावा महावितरणच्या मुख्य कार्यालयामार्फत घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सातारा जिल्ह्यातील ४,७९० थकबाकीदारांचा वीज पुरवठा महावितरण कंपनीने खंडीत केल्याबाबत..

(८) ३२४६७ (१२-०१-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील ४७९० थकबाकीदारांचा वीज पुरवठा दि. १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास महावितरण कंपनीने खंडीत केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात वीज पुरवठा खंडीत केल्यामुळे याचा विपरीत परिणाम पाणीपुरवठा व आरोग्यावर होत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सातारा जिल्ह्याला वीज पुरवठा नियमित सुरु ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) हे अंशत खरे आहे. सातारा जिल्हयात एकूण ३७१७ ग्राहकांचा वीज पुरवठा थकबाकीसाठी दि. १३ ऑक्टोबर, २०२१ पर्यंत खंडीत केलेला आहे. सर्व संबंधित ग्राहकांना वीज पुरवठा खंडीत करण्यापूर्वी नियमाप्रमाणे नोटीस देण्यात आल्या होत्या.

(२) हे खरे नाही

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कुर्ला एल विभागातील स गो बर्वे मार्गावरील पूर्व व पश्चिम पीचेहाटीची जागा मोकळी

(९) ३२४९४ (११-०१-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ला एल विभागातील स गो बर्वे मार्गावरील पूर्व व पश्चिम भागात झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात आलेली असून सदर योजनेंतर्गत काम पूर्ण झालेले असतानाही योजनेच्या पीचेहाटीची जागा मोकळी करून विकासकाने महानगरपालिकेकडून अद्याप हस्तांतरित केली नसल्याने नुकतेच माहे सप्टेंबर २०२१ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू भागातील झोपडपट्टी पुर्नवसन योजनेच्या पीछेहाट जागा मोकळी करून रस्त्यालगतच्या अनिवासी गाळेधारकाना इमारतीमध्ये अनिवासी गाळे उपलब्ध करून रस्ता मोकळा करून महानगरपालिकेकडे हस्तांतरित न करण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास,सदर पिचेहाट जागा हस्तांतरित न केल्यामुळे स.गो.बर्वे मार्गावर वाहनाची प्रचंड वाहतूक कोंडी होत असून त्यामुळे नागरिकांना त्रास होत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अतिरिक्त आयुक्त महानगरपालिका व झोपडपट्टी पूनर्वसन प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांशी पत्र व्यवहार केलेला आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या पत्राच्या सहाय्याने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पूनर्वसन प्रकल्पाच यांनी दि १२ ऑक्टोबर,२०२० रोजी घेतलेल्या बैठकीच्या अनुषंगाने मा. सहाय्यक आयुक्त एल विभाग यांनी दि ३ डिसेंबर,२०२० व ०५ जानेवारी,२०२१ रोजी संयुक्त बैठक घेऊन सदर योजनेच्या पिछेहाट रस्ता विनाविलंब बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित करण्याबाबत निर्देश देऊनही अद्यप कोणतीच कार्यवाही झालेली नाही हेही खरे आहे काय,

(५) असल्यास,सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय , त्यात काय आढळून आले,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) : (१) व (२) स.गो.बर्वे मार्गालगत असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना अद्यापपर्यंत पूर्ण झालेल्या नसल्यामुळे या योजनांच्या पीछेहाटीची जागा बृहन्मुबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

सवेरा योजनेतील १६, धम्मसेवा व फातीमाबी योजनेतील १० व गोल्डन प्लाझा योजनेतील १ अशा एकूण २७ अनिवासी गाळेधारकांना विकासकाकडून पर्यायी जागा देण्यात आलेली असूनही हे झोपडीधारक विकासकास सहकार्य करीत नाहीत, त्यापैकी सवेरा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील झोपडीधारकांविरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३३(३८) अंतर्गत निष्कासनाची कारवाई सुरु आहे. तसेच गोल्डनप्लाझा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील १ अनिवासी गाळेधारकाच्या पात्रतेबाबत व शाहीद जीतेश झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील ३८ झोपडीधारकांच्या निष्कासनाबाबतची प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. तसेच कुर्ला कदम झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील झोपडीधारकांच्या पात्रतेबाबत कार्यवाही सुरु आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) व (६) दि.१२.१०.२०२० रोजीच्या बैठकीत कुर्ला (पूर्व) व (पश्चिम) येथील स.गो.बर्वे मार्गालगत असलेल्या विविध झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमधील बृहन्मुंबई महानगरपालिकेस देय असलेल्या सेट बॅक एरीयाच्या हस्तांतरणाबाबत सूचना देण्यात आलेली असूनही याबाबत संबंधित विकासकांनी कार्यवाही केलेली नसल्याने सदरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे विकासक/वास्तुविशारद यांना विक्री घटकाचे बांधकाम थांबवण्याबाबत (Stop Work) आदेश देण्यात आलेले आहेत. कुर्ला (पूर्व) व (पश्चिम) येथील स.गो.बर्वे मार्गालगत असलेल्या सवेरा सह.गृहनिर्माण संस्थेतील २६ झोपडीधारकांविरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३३(३८) अन्वये निष्कासनाबाबतची पुढील कारवाई करण्यात येत आहे. तसेच फातीमाबी व धम्मसेवा, कुर्ला कदम, गोल्डन प्लाझा, फीतवाला, बुध्द विहार व अंगुलीमाला, या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या विकासकांकडून कलम ३३(३८) अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास प्रस्ताव सादर करण्यात आलेला नसल्यामुळे त्याबाबत पाठपुरावा करुन कार्यवाही करण्यात येईल.

पनवेल (जि.रायगड) तालुक्यात चोऱ्यांच्या प्रमाणात वाढ होऊन नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाल्याबाबत

(१०) ३२६५० (०७-०१-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यात विशेषत: शहरी भागात छोट्या मोठ्या चोऱ्यांच्या प्रमाणात वाढ झाल्याने नागरिकांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील साई, खारघर, नवीन पनवेल परिसरात सोनसाखळी चोरट्यांच्या वाढलेल्या उपद्रव्यामुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधीत पोलीस विभागातील अपुरे मनुष्यबळ व सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य पाऊल न घेतल्यामुळे छोट्या मोठ्या चोऱ्यांच्या प्रमाणात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पोलीस विभागात लागणारी साधन सामुग्री तातडीने पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) ऑक्टोबर,२०२१ दरम्यान पनवेल परिमंडळ-२ अंतर्गत छोट्या मोठ्या चोऱ्यांच्या प्रमाणात वाढ झाली आहे.
(२) नाही. सदर कालावधीत सदर परिसरातील सोनसाखळीच्या गुन्हयातील सर्व आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्हे उघडकीस आले आहेत. तसेच महिला सुरक्षेच्या अनुषंगाने विशेष पथके स्थापन करुन तक्रारीच्या अनुषंगाने तात्काळ कारवाई करण्यात येत आहे.

(३) पोलीस स्टेशनकडील उपलब्ध मुनष्यबळाचा वापर करुन गुन्हयांना प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने विशेष प्रयत्न करण्यात येतात.
गुन्हयाचे वाढ रोखण्याबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना - १) पोलीस ठाणेहद्दीत दिवसा व रात्री २४ तास बिट मार्शल मार्फत सतर्क गस्त नेमण्यात येते.
२) पोलीस ठाणे हददीतील महत्वाचे ठिकाणी, चौकात प्रभावीपणे नाकाबंदी करण्यात येते.
३) महत्वाचे ठिकाणी नाकाबंदी करुन वाहने चेक केली जातात.
४) गुन्हे वाढीचे प्रमाण रोखण्यासाठी पोलीस ठाणे स्तरावर गुड मॉर्निंग स्कॉड तसेच अँन्टीचेन स्कॉड तयार करण्यात आले आहे .
५) पोलीस ठाणे स्तरावर नेमण्यात आलेल्या गुन्हे प्रकटीकरण पथकाव्दारे साध्या वेशात गस्त करण्यात येते.
६) चोऱ्यांना आळा बसावा या अनुषंगाने पोलीस ठाणे हद्दीत सोसायटीच्या गेटवर जनजागृतीपर अभियान म्हणुन बॅनर लावले जातात. तसेच जनजागृतीपर विविध कार्यक्रम आयोजीत करुन नागरीकांनासतर्क राहण्याबाबत आवाहन करण्यात येते.
७) गुन्हयातील अटक केलेल्या आरोपीतांवर व संशयीत इसमांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात येते.
(४) पोलीस आयुक्तालय कार्यालयास पोलीस महासंचालक कार्यालयाकडून आवश्यक ती साधनसामुग्री पुरविण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

खडकवासला (जि.पुणे) येथे विधानसभा मतदारसंघात कायदा सुव्यवस्था कोलमडली असल्याबाबत

(११) ३२७०८ (०७-०१-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकवासला (जि.पुणे) येथे विधानसभा मतदारसंघात अवैध व्यवसाय, लॉटरी, रोमिओ, लुटमार, खून, दरोडे, हॉटेल लॉजिंगच्या माध्यमातून अवैध व्यवसाय, भर दिवसा रस्त्यालगत सुरु असलेला देह व्यापार, वाढता सायबर क्राईम सारख्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहकार नगर, भारती, सिंहगड ठाण्याच्या हद्दीमध्ये सामान्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून पोलिसांचा ज्येष्ठ नागरिकांशी, छोट्या मोठ्या व्यापारी वर्गाशी होत असलेला दुर्व्यवहार दिवसागणिक समोर येत असून सोसायट्या, वस्ती भागात पोलिसांकडून पेट्रोलिंग देखील होत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी कोणत्याही पोलीस ठाण्याच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून लोकप्रतिनिधींशी कुठल्याही प्रकारे समन्वय नसून केलेल्या सूचना, तक्रारींवर तक्रार दाखल करावयास गेलेल्या नागरिकास मिळणाऱ्या वागणुकीमुळे व मनमानी कारभारामुळे नागरिकांमध्ये पोलिसांविषयी भीती निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी कायदा सुवस्था पूर्णक्षमतेने राखून वाढती गुन्हेगारी आणि अवैध व्यवसाय आटोक्यात आणण्यासाठी आणि लोकप्रतिनिधींशी समन्वय ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(५) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही,

खडकवासला (जि.पुणे) या विधानसभा मतदारसंघात पोलीस आयुक्त, पुणे शहर व पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे अंतर्गत येणाऱ्या पोलीस स्टेशन कडून नागरिकांच्या तक्रारीची योग्य ती दखल घेतली जाते. त्यामुळे नागरीकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींशी योग्य तो समन्वय ठेवून त्यांनी दिलेल्या सूचनांबाबत आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात येते.

(४) सदर प्रकरणी कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशन अंतर्गत सर्व पोलीस चौकीचे प्रभारी अधिकारी, महिला अधिकारी हे सर्व शाळा कॉलेज मध्ये समक्ष भेटी देवुन विद्यार्थी मुलींना समुपदेशन करुन मार्गदर्शन करीत असतात. सायबर क्राईम तसेच घर फोडया, चैन स्नॅचिंग यांना प्रतिबंध करण्यासाठी प्रत्येक पोलीस चौकी हद्दीत सोसायटी मिटींग घेवुन त्यांना नव्याने होणाऱ्या ऑनलाईन फसवणुकीबाबत माहिती देवुन त्याबाबत जनजागृती केली जाते. तसेच सायबर गुन्ह्यांची माहिती पत्रके पोलीस ठाणे आवारात लावण्यात आलेले आहेत. पोलीस ठाणे व्दारे सायबर गुन्हे विषयी माहिती प्रसारीत केली जात असल्याने जेष्ठ नागरिक लहान मुले मुली इ. मध्ये पोलीसांबाबत सुरक्षिततेची भावना निर्माण झालेली आहे. जेष्ठ नागरिकांनी पोलीस स्टेशन येथे दिलेल्या अर्जावर तात्काळ दखल घेतली जात असून त्यांना आपण सुरक्षित असलेबाबतची भावना निर्माण करण्यात यश प्राप्त झालेले आहे .
(५) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली (जि.नांदेड) येथे दरोडेखोरीच्या घटना वाढत असल्याबाबत

(१२) ३२८८१ (०७-०१-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली (जि.नांदेड) येथील गेट उड्डाणपूलावर बँकेत पैसे भरण्यासाठी जात असलेल्या एका व्यापाऱ्याला पिस्तूलाचा व शस्त्राचा धाक दाखवून त्याचे १४ लाख ८० हजार रुपये लुटण्यात आल्याचे दिनांक १२ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याचबरोबर वडेपुरी जवळ एका पेट्रोलपंपाचे व्यवस्थापक बँकेत पैसे भरण्यासाठी जात असताना तिघा दरोडेखोरांनी त्यांच्या डोळयात मिरचीची पूड टाकून ८ लाख रुपये असलेली बॅग हिसकावू एकूण २३ लाखांची रक्कम दरोडेखोरांनी लुटली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार या दोन्ही प्रकरणातील आरोपींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) सदर व्यापारी हे दिनांक १०.५.२०२१ रोजी दुचाकीवरून एका बॅगेत रू.१४,८४,०००/- इतकी रोख रक्कम व रू.०८,९५,७३३/- इतक्या रकमेचे धनादेश बँकेत भरण्यासाठी जात असताना नांदेड येथील हिंगोली गेट भागातील ओव्हर ब्रीजच्या उतारावर अज्ञात चोरट्यांनी बंदुक व चाकूचा धाक दाखवून सदर बॅग चोरून नेली.
(२) पेट्रोल पंप मॅनेजर हे दिनांक १०.५.२०२१ रोजी पेट्रोल डिझेल विक्रीची एकूण रक्कम बँकेत जमा करण्याकरीता दुचाकीवरून वडेपूरी येथे जात असताना तीन चोरट्यांनी डोळयात मिरचीची पावडर टाकून तसेच चाकू सारख्या तीक्ष्ण हत्याराने वार करून पेट्रोल पंप मॅनेजर यांच्याकडील रू.०८,४३,१६०/- इतकी रक्कम चोरून नेली.
(३) व्यापारी लुटीच्या घटनेत वजिराबाद पोलीस स्टेशन नांदेड येथे गु.र.नं. १३७/२०२१, भा.दं.वि. कलम ३९२,३९५,५०६,१२३(ब), ३४ सह, शस्त्र अधिनियम ३ व ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात एकूण ६ आरोपी निष्पन्न झाले असून ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. एक आरोपी फरार असून सदर आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून फिर्यादीच्या चोरलेल्या रकमेपैकी रू.४,८८,४००/- व गुन्ह्यात वापरलेली पिस्टल व दुचाकी हस्तगत करण्यात आलेली आहे.

अटक करण्यात आलेल्या ५ आरोपींविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. फरार आरोपीविरूध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ नुसार कार्यवाही करण्याबाबत मा.न्यायालयास विनंती करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

पेट्रोल पंप मॅनेजर लूट प्रकरणात सोनखेड पोलीस स्टेशन जिल्हा नांदेड येथे गु.र.नं. ६८/२०२१, भा.दं.वि. कलम ३९५, ३९७, १२०(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात एकूण ०९ आरोपी निष्पन्न झाले असून आरोपींकडून फिर्यादीच्या चोरलेल्या रकमेपैकी रू.१,६०,७००/- इतकी रोख रक्कम व मोबाईल फोन हस्तगत करण्यात आला आहे.

तसेच सर्व आरोपीविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) विलंब झालेला नाही.

राज्यात ऑनलाईन रोलेटसारख्या जुगारातून युवकांची फसवणूक होत असल्याबाबत

(१३) ३२८९१ (१०-०१-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय उप मुख्य**मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ऑनलाईन रोलेटसारख्या जुगारातून युवकांची फसवणूक केल्याच्या तक्रारी वाढत असल्याचे दिनांक १४ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणावर आळा घालण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) : (१) गेल्या २ वर्षात राज्यात ऑनलाईन रोलेटसारख्या जुगारातून युवकांची फसवणूक झाल्याबाबत ३३ गुन्हे दाखल असून सदर ३३ गुन्हे उघडकीस आले असून या प्रकरणी १३२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(२) सदर प्रकरणांवर आळा घालण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

i) स्थानिक वर्तमानपत्रे, सर्व सोशल मिडीया प्लॅटफार्मवर ऑनलाईन जुगाराविषयी जनजागृती करण्यात येते.

ii) ऑनलाईन रोलेट सारख्या जुगारावर आळा घालण्यासाठी असे बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती विरूध्द जुगार कायदा, भारतीय दंड विधान, लॉटरी रेगूलेशन कायदा इ.कायद्यातील कलमाखाली केसेस दाखल करून कठोर कारवाई करण्याच्या सूचना/आदेश वेळोवेळी देण्यात येवून त्यानुसार कारवाई करण्यात येते.

iii) ऑनलाईन रोलेट सारख्या जुगारावर आळा घालण्यासाठी वेळोवेळी कारवाईसाठी विशेष मोहीम घेण्यात येवून त्या कालावधीत जास्तीत जास्त केसेस करण्यात येतात.

iv) ऑनलाईन रोलेट सारख्या जुगारावर आळा घालण्यासाठी सायबर सेलकडून देखील विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यामध्ये विविध ठिकाणी झालेल्या कारवाईत अंमली पदार्थ जप्त केल्याबाबत

(१४) ३२९१८ (०७-०१-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध ठिकणी झालेल्या कारवाईत दिनांक १ जानेवारी, २०२१ ते १७ ऑक्टोबर, २०२१ यश कालावधीत वा त्यासुमारास किती कोटी रुपयांचे अंमलीपदार्थ जप्त करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अंमली पदार्थाची विक्री व खरेदी करणाऱ्या किती गुन्हेगारांना अटक करण्यात आली, तसेच त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) व (२) राज्यात विविध ठिकाणी झालेल्या कारवाईत दिनांक १ जानेवारी, २०२१ ते १७ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास रू.९९,९१,६१,५२२/- इतक्या किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले असून २१८१ आरोपितांना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी ३५५ आरोपितांची प्रकरणे मा.न्यायालयात न्यायप्रविष्ट असून ८६४ आरोपितांची जामिनावर मुक्तता करण्यात आली आहे. तसेच उर्वरित आरोपितांची प्रकरणे अधिकचे पुरावे गोळा करण्यासाठी तपासाधीन आहेत.
(३) अंमली पदार्थ विरोधी कारवाई अंतर्गत प्रभावी तपासाबरोबरच वेळोवेळी अंमली पदार्थ विरोधी विशेष मोहीमा घेण्यात येतात. राज्यात आयुक्तालय स्तरावर व जिल्हास्तरावर अंमली पदार्थ विरोधी कक्षाची स्थापना करण्यात आली असून तेथे कार्यरत अंमलदारांना अंमली पदार्थांच्या विक्री, सेवन यासारख्या बाबींवर प्रतिबंध करण्यासाठी योग्य ती दक्षता घेण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. जनतेने अंमली पदार्थांच्या आहारी जाऊ नये म्हणून जनजागृतीच्या उद्देशाने "२६ जून" या अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त २६ जून ते १० जुलै असा अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा साजरा करण्यात येतो. याशिवाय वेळोवेळी अंमली पदार्थ व त्याचे दुष्परिणाम याबाबत जनतेस तसेच विद्यार्थ्यांना माहिती देणे, फिल्म दाखविणे, चर्चासत्र, हॅन्डबील वाटप व भिंती पोस्टर्सचे प्रदर्शन करणे तसेच प्रचार फेऱ्या, मॅरेथॉन, मोहल्ला कमिटी, पब्लीक मिटींग असे कार्यक्रम घेण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

देवकरा (ता.अहमदपूर, जि. लातूर) या गावातील विद्युत पुरवठा करणारा डि.पी. जळाला असल्याबाबत

(१५) ३३०३४ (१२-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवकरा (ता.अहमदपूर, जि. लातूर) या गावातील विदयूत पुरवठा करणारा डि.पी. दिनाक २३ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास जळाल्यामुळे पूर्ण गांवाचा वीज पुरवठा १२ दिवस खंडित असल्याने गावास नळाद्वारे होणारा पाणीपुरवठा देखील बंद झाला होता, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यांत आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विदयुत पुरवठा पुर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) व (२) देवकरा (ता. अहमदपूर, जि. लातूर) या गावासाठी विद्युत पुरवठा करणारा रोहित्र दि. २३.०८.२०२१ रोजी नादुरुस्त झाले होते व ते दि. १०.०९.२०२१ रोजी बदलण्यात आले. रोहित्र नादुरुस्त झालेल्या कालावधीत गावातील विद्युत भार गावालगतच्या रोहित्रावर जोडल्यामुळे गावातील ग्राहकांचा विद्युत पुरवठा सुरळीत सुरु होता.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

थोडगा (ता.अहमदपूर,जि.लातूर) येथील विदयुत सबस्टेशनवर अतिरिक्त पॉवर फिडर बसविण्याबाबत

(१६) ३३०६४ (१२-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्हयातील अनेक शेतकऱ्यांनी शेतीसाठी वीज जोडणीचे डिमांड रक्कम भरुनही शेतीला वीजपुरवठा सुरळीतपणे होत नसल्याचे दि.२४ मे,२०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहमदपूर तालुक्यातील किनी कदू,सावरगाव थोट, मोघा, टेंभुर्णी आदिं गावात व लगतच्या परिसरात कमी दाबाने होणारा वीजपुरवठा सुरळीतरित्या होण्यासाठी थोडगा (ता.अहमदपूर) येथील सबस्टेशनवर अतिरिक्त पॉवर फिडर बसविण्यांत यावेत, अशी मागणी वीज विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत स्थानिक लोकप्रतिनिधीं यांनी केली असल्याचे निदर्शनास आले , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने थोडगा (ता.अहमदपूर) विदयुत सबस्टेशनवर अतिरिक्त पॉवर फिडर बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
लातूर जिल्हयात दि.३१.०५.२०२१ अखेर ७९५० कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. त्यापैकी मार्च २०१८ पूर्वीचे १६८९ कृषीपंप व मार्च २०१८ नंतरचे ६२६१ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. उच्चदाब वितरण प्रणाली योजने मध्ये मार्च २०१८ पूर्वी पैसे भरलेल्या ४१२४ कृषीपंपांचा समावेश करण्यात आला होता व त्यापैकी दि. ३०.११.२०२१ अखेर ३७५५ कृषीपंपांचे ऊर्जीकरण करण्यात आले असून यामध्ये मार्च २०१८ पूर्वीच्या प्रलंबित १६८९ कृषीपंपांपैकी १३२० कृषीपंपांना दिलेल्या वीज जोडण्यांचा समावेश असून उर्वरित ३६९ कृषीपंपांची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच, मार्च २०१८ नंतरच्या पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ६२६१ कृषीपंपांपैकी दि. ३०.११.२०२१ अखेर ८३९ ग्राहकांना कृषिपंप विज जोडणी धोरण २०२० अंतर्गत वीज जोडण्यादेण्यात आलेल्या असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) सुधारीत वितरण प्रणाली बळकटीकरण योजना अंतर्गत ३३/११ के.व्ही. थोडगा उपकेंद्र मध्ये १५ एम.व्ही.ए. अतिरिक्त रोहित्र प्रस्तावित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ग्रामपंचायतींची थकीत विज बिले माफ करणे, तसेच वीज देयके थकीत असणाऱ्या ग्रामपंचायतींच्या व्याजाची व दडांची रक्कम माफ करणेबाबत.

(१७) ३३१७६ (१२-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.राजेश पवार (नायगांव) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामपंचायतींची थकीत विज देयके माफ करणे, तसेच वीज देयके थकीत असणाऱ्या ग्रामपंचायतींच्या व्याजाची व दडांची रक्कम माफ करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ऊर्जा मंत्री यांचेसमवेत बैठकीचे आयोजन करण्याबाबत दिनांक २८ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामपंचायतींच्या हद्दीमध्ये असणारे विदयुत खांब, ट्रान्सफार्मर व विदयुत उपकेंद्रे यांच्या भु-भाडयाची रक्कम वर्षानुवर्षे महावितरण कंपनीकडे थकित असुन प्रथम ती थकीत रक्कम ग्रामपंचायतींना अदा करावी अशी मागणी कोल्हापूर जिल्हयातील सर्व सरपंच यांनी अधिक्षक अभियंता कार्यालय, कोल्हापूर येथील कार्यालयाबाहेर आंदोलन करुन केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यासह देशामध्ये गेल्या २ वर्षांपासुन कोरोना सदृष्य परिस्थितीमुळे ग्रामपंचातींच्या महसुलामध्ये मोठया प्रमाणात घट झाली असुन राज्यातील सर्वच ग्रामपंचायतींची वीज देयके माफ करणे, तसेच थकीत असणाऱ्या ग्रामपंचायतींच्या व्याजाची व दडांची रक्कम माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
दि. १८.१०.२०२१ रोजी कोल्हापूर जिल्हयामधील ग्रामीण भागातील पथदिवे आणि पाणी पुरवठा योजनांचा विद्युत पुरवठा खंडीत केल्याच्या निषेधार्थ कोल्हापूर जिल्हयामधील जिल्हा परिषद सदस्य व सर्व सरपंच यांनी कोल्हापूर परिमंडळासमोर आंदोलन केले होते. ग्रामपंचायतीच्या हद्दीतील असणारे खांब, ट्रान्सफार्मर व विद्युत उपकेंद्रे यांच्या भु-भाडयाची आकारणी न करणेबाबत शासनाने शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.११७/ऊर्जा-५, दि.२०.१२.२०१८ नुसार ग्रामपंचायत यांनी विद्युत वितरण पायाभूत सुविधांसाठी (उपरी वाहिनी, भूमिगत वाहिनी, वितरण रोहित्र, विद्युत

खांब, विद्युत मनोरे, पारेषण वाहिनी इ.) कोणत्याही प्रकारची कर आकारणी करण्यात येऊ नये यासाठी संबंधित अधिनियम, नियम व आदेश यामध्ये संबंधित ग्रामविकास विभागाने योग्य ती सुधारणा करण्यास मंत्रीमंडळाच्या मान्यतेने असे आदेश निर्गमित केले आहेत.
(३) ग्रामपंचायतीकडे असणाऱ्या पथदिवे व पाणीपुरवठा योजनांच्या वीजदेयके, थकबाकी वसुलीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस वाहतूकदार गाडी मालकांची टोळी मुकादम यांनी केलेल्या आर्थिक फसवणूकीबाबत

(१८) ३३२०४ (०७-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस वाहतूकदार गाडी मालकांची टोळी मुकादम यांनी केलेल्या आर्थिक फसवणूकीसंदर्भात तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य (शहरे) व पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांचेकडे मुकादमांवर फौजदारी गुन्हे नोंद करण्याबाबत दिनांक ३० डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ऊस वाहतूकदार गाडी मालकांना दरवर्षी ४० ते ५० कोटी रुपयांची फसवणूक करण्याचे काम टोळी मुकादमांकडून होत आहे तसेच फसवणूक झालेल्या गाडी मालकांकडून नोंदविण्यात आलेले गुन्हे व फसवणुकीची रक्कम किती असून तपशीलवार माहिती काय आहे,
(३) असल्यास, याप्रकरणी जिल्ह्यातील ऊस वाहतूकदार व गाडी मालकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळी मुकादमांवर फौजदारी गुन्हे नोंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांच्याकडे प्राप्त तक्रारीनुसार ऊस वाहतूकदार गाडी मालकांच्या टोळी मुकादमाविरुध्द संबंधित पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल करण्यात आला आहे.
(२) कोल्हापूर जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनमध्ये सन २०२० मध्ये टोळी मुकादमाकडून ऊस वाहतूक गाडी मालकांची फसवणूक झाल्याप्रकरणी एकूण ०६ गुन्हे दाखल असून फसवणूक रक्कम रु.५०,६०,०००/- आहे. तसेच सन २०२१ मध्ये ०६ गुन्ह्यांत रु.५८,३९,०१५/- इतक्या रकमेची फसवणूक झाली आहे.
(३) कोल्हापूर जिल्ह्यातील टोळी मुकादमा विरुध्द तक्रारी प्राप्त होताच कायदेशीर कारवाई करण्यात येते. या अनुषंगाने गेल्या दोन वर्षात एकूण १२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

राज्यात ३०० युनियटपर्यंत मीटर भाडे, सरकारी वीज शुल्क आणि वीज विक्रीकरामध्ये सवलत देण्याबाबत

(१९) ३३२९४ (१२-०१-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महावितरण कंपनीच्या मागील ७ वर्षांच्या काळात मोठ्या प्रमाणात थकबाकी वाढल्याने सुमारे ७१ हजार कोटींच्या वर थकबाकी गेल्याचे निवेदन महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसीटी वर्कर्स फेडरेशनने मा.मुख्यमंत्री महोदयांना दिले असल्याची बाब माहे मार्च २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात वीजेच्या दरात झालेली प्रत्यक्ष वाढ वीजेचा जास्त वापर प्रत्यक्ष रिडिंग झाल्यानंतर देण्यात आलेल्या जास्तीच्या वीज देयकासह विविध कारणांमुळे बहुसंख्य ग्राहकांनी वीज देयके भरणे बंद केले असल्याने महावितरण कंपनी डबघाईस आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महावितरण कडून ३०० युनिटपर्यंत पूर्वी देण्यात येणारी सवलत केवळ १०० युनिट पर्यंत दिल्याने आणि मिटरच्या मासिक निश्चित शुल्कात वाढ करणे, सरकारी वीज शुल्क आणि वीज विक्रीवर महाराष्ट्र सरकारचा कर लावल्याने ग्राहकांना जास्तीचे वीज बिल भरावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ऊर्जा मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे ३०० युनियटपर्यंत मीटर भाडे, सरकारी वीज शुल्क आणि वीज विक्रीकर सवलत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) महावितरणची माहे सप्टेंबर-२०२१ अखेरची थकबाकी रु.६६,१६३ कोटी आहे.
(३) हे खरे नाही.
(४) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.५९/ऊर्जा-५ दि.२२.०४.२०२० अन्वये वीज धोरण ठरविण्याबाबत समिती गठीत करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदर निर्णयानुसार स्थापन केलेल्या समितीच्या कार्यकक्षेत राज्यातील ० ते १०० युनीट विजेचा वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज द्यावी अथवा नाही ही बाब अंतर्भूत करण्यात आलेली आहे. तसेच वीज शुल्क व वीज विक्रीकर यावर सवलत देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

जळगांव जिल्हयातील भूसावळ एमआयडीसी मधील विद्युत पुरवठा वारंवार खंडीत होत असल्याबाबत

(२०) ३३२९७ (१२-०१-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भूसावळ एमआयडीसी मधील विदयुत पुरवठा वारंवार खंडीत होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनधींनी तक्रार करुनही वीज वारंवार खंडीत होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिंधी यांनी याबाबत बैठक घेऊन एमआयडीसी (यांत्रीकी) यांना सुचना दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विदयुत पुरवठा सुरळीत चालु करण्याबात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) देखभाल व दुरुस्तीची कामे पूर्ण झाल्यामुळे औद्योगिक विकास महामंडळातील वारंवार खंडित होणाऱ्या विद्युत पुरवठयाचे प्रमाण कमी झाले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

गेवराई (जि.बीड) तालुक्यातीत शेतकऱ्यांना वीज देयक भरण्यासाठी सवलत देण्याबाबत

(२१) ३३३५३ (१२-०१-२०२२). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेवराई (जि.बीड) तालुक्यात माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची

शेत पिके यांचे नुकसान झाले असुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली नसल्यामुळे शेतकऱ्यांना वीज देयके भरणे अशक्य असल्याने वीज वितरणकडून सक्तीची वीज देयक वसूल व वीज जोडणी तोडणे सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रितिनीधींनी किमान दिवाळीच्या वेळी वीज जोडणी तोडू नये व वीज देयक भरण्यासाठी सवलत देण्यात यावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांची वीज जोडणी तोडणे थांबवण्याबाबत व वीज देयक भरण्यास सवलत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
लोकप्रतिनिधींच्या आग्रहास्तव दिवाळीच्या वेळी वीज पुरवठा खंडीत करण्यात आलेला नाही.
(३) कृषी ग्राहकांचे हित जोपासण्यासाठी शासनाने सर्वसमावेशक “कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०”जाहिर केले आहे. ह्या धोरणा अंतर्गत सुधारीत पहिल्या वर्षी संपूर्ण वीज बिल भरल्यास थकबाकीवर ५०% पर्यंतची सूट ग्राहकांना देण्यात येत असून देय रक्कम टप्प्या टप्प्याने भरणा करण्याची देखील सुविधा देण्यात येत आहे. अशाप्रकारे जमा होणाऱ्या महसूलापैकी ६६% निधी हा त्या जिल्ह्यातील वीजेच्या पायाभूत सुविधांकरिता वापरण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील विज वितरण कार्यालयाच्या शिरुर उपविभागाच्या विभाजनाबाबत

(२२) ३३४४१ (१२-०१-२०२२). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील विज वितरण कार्यालयाचे शिरुर उपविभागाचे विभाजन करुन नवीन न्हावरा उपविभाग करणे तसेच शिरुर, न्हावरा, टाकळी हाजी, मांडवगण फराटा, वडगांव रासाई या कार्यालयाचे विभाग करुन नवीन शिरुर-२, मलठण व शिरसगांव काटा शाखा कार्यालय निर्मितीसाठीचा प्रस्ताव महावितरण वरिष्ठ कार्यालयाकडे मंजूरीसाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यालय विभाजनामुळे नवीन कार्यालयाच्या निर्मितीमुळे विज ग्राहकांच्या समस्या जलद गतीने सोडविण्यासाठी उपयोग होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नवीन उपविभाग व शाखा कार्यालय निर्मितीसाठी शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) होय हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) महावितरण कंपनीव्दारे कंपनीची नवीन कार्यालय निर्मितीची कर्मचारी मानके/ ग्राहक मानके पुनर्विलोकनाची कार्यवाही सुरु असून सदरची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर वरील प्रस्तावासंदर्भात आर्थिक दायित्वाचा विचार करुन धोरणात्मक निर्णय घेऊन उचित कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीच्या लघुदाब वाहिनीवर तारा ऐवजी हवाई गुच्छीत केबल वापरण्याबाबत

(२३) ३३४६२ (१२-०१-२०२२). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीच्या लघुदाब वाहिनीवरील तारांच्या घर्षणाने शॉर्टसर्किट होऊन रोहित्र नादुरुस्त होणे, तारा तुटल्यामुळे अपघात होऊन जिवीत व वित्तहानी होत असल्याचे निदर्शनास येत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास , उक्त बाबींवर आळा घालण्यासाठी लघुदाब वाहिनीवरील तारांऐवजी हवाई गुच्छीत केबल (Air Bunch Cable) वापरल्यास रोहित्रांचे बिघाड, तारा तुटुन होणारे अपघात कमी होतील तसेच वीज गळती कमी होऊन शासनाचा महसूल वाढण्यास मदत होईल हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात प्रथमतः हा प्रयोग पुणे जिल्हयात राबविणेबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे. लघुदाब वाहिनीवरील तारांऐवजी हवाई गुच्छीत केबल (Air Bunch Cable) वापरल्यास तारांच्या घर्षणाने शार्टसर्किट होणे काही प्रमाणात कमी होते. त्या अनुषंगाने लघुदाब वाहिनीवरील तारांऐवजी हवाई गुच्छीत केबल (Air Bunch Cable) आवश्यक ठिकाणी वापरण्यात येते.

(३) पुणे जिल्हयात पुणे परिमंडळ अंतर्गत दिनदयाळ उपाध्याय योजनेअंतर्गत ०.४२ किमी, एकात्मिक विकास योजनेअंतर्गत (IPDS) १.१८ किमी, HLF (High Loss Feeder) योजने अंतर्गत १.१६ किमी, जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ०.६ किमी आणि देखभाल व दुरुस्तीच्या कामामध्ये ५.९३ किमी., SSMR (System Strengthening in Metropolitan Region)योजनेअंतर्गत ५०.० किमी अशी एकूण ५९.४७ किमी अंतराचे लघुदाब हवाई गुच्छीत केबल (Air Bunch Cable) वापरण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महावितरणाच्या निमोणे (ता. शिरुर, जि.पुणे) येथील उपकेंद्रावर अखंडीत वीज पुरवठा करण्याच्या प्रस्तावाबाबत

(२४) ३३४६४ (१२-०१-२०२२). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इन्फ्रा २ (ता.शिरुर, जि.पुणे) मध्ये नवीन ३३/११ के.व्हि. निमोणे उपकेंद्र सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नवीन उपकेंद्र कमी भारीत असुन उपकेंद्रा जवळील परिसरात २२ के.व्हि. उच्चदाब वाहिनीवरुन विदयुत पुरवठा करण्यात येत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, २२ के.व्ही उच्चदाब वाहिनीची लांबी खूप जास्त असल्याने अखंडीत विदयुत पुरवठा करण्यास विविध समस्या येत आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर २२ केव्ही उच्च दाब वाहिनी वरील भार इन्फ्रा २ मध्ये चार नवीन ३३/११ के.व्ही. निमोणे उपकेंद्रावर जोडून अखंडीत वीज पुरवठा करण्यास सोईचे होणार असून याबाबतचा प्रस्ताव महावितरण वरिष्ठ कार्यालयाकडे मंजूरीसाठी सादर केलेला आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नवीन ३३/११ के.व्ही निमोणे उपकेंद्रावर जोडण्यात येणारा प्रस्ताव मंजुर होण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) व (५) हे खरे आहे.
निमोणे व इतर परिसरातील वीज पुरवठा सुरळीत करणेसाठी मल्लिकार्जून, आलेगांव, तांदळी, महागणपती, तळेगांव इ. वाहिन्या २२ के. व्ही. वरुन ११ के. व्ही. मध्ये रुपांतरीत करणे आवश्यक आहे.

सदर वाहिन्यांची रोहित्रे २२ के. व्ही. वरुन ११ के. व्ही. मध्ये रुपांतरीत करण्यासाठी रु. ५.५३ कोटी रक्कमेचे आवश्यकता असून पायाभूत आराखडा २ ही योजना बंद झालेली आहे. त्यामुळे निमोणे व इतर गावातील रोहीत्र बदलण्याचे काम जिल्हा स्तरीय कृषी आकस्मीक निधी (ACF) च्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

बोरीवली पूर्व,मुंबईतील येथील गणेशनगर मागाठाणे रहिवासी एस.आर.ए.सहकारी गृहनिर्माण सह.संस्था मर्या. यांना सदनिका वितरीत करणेबाबत

(२५) ३३५४३ (११-०१-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **गृहनिर्माण / उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील बोरीवली पूर्व येथील गणेशनगर मागाठाणे रहिवासी एस.आर.ए.सहकारी गृहनिर्माण सह.संस्था मर्या. हि मे.धनश्री डेव्हलपर्स व सूर्या डेव्हलपर्स तर्फे श्री.शंकर बोरकर व इतर यांना झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत पुनर्विकासासाठी सन २०१६ मध्ये दिल्याचे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सदर कामाच्या सद्यस्थितीची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले तदनुसार सदर मे.धनश्री डेव्हलपर्स यांनी सन २०१६ पासून आजतागायत एकही सदनिका न बांधल्याचे निदर्शनास येत आहे हे हि खरे आहे काय ,
(४) असल्यास, आत्तापर्यंत एकही सदनिका न बांधण्याची कारणे काय आहेत , तसेच कधीपर्यंत या झोपडपट्टीतील नागरिकांना सदनिका वितरीत करण्यात येणार आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

सदर योजने संदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.)अधिनियम, १९७१ मधील कलम १३(२) अन्वये विकासक मे.धनश्री डेव्हलपर्स यांची नियुक्ती रद्द करुन नविन विकासक मे.सुर्या डेव्हलपर्स यांची दि.०३.०३.२०१७ रोजी नियुक्ती करण्यात आली आहे.
(२) व (३) सदर योजनेत मे.सुर्या डेव्हलपर्स यांची नियुक्ती दि.०३.०३.२०१७ रोजी केलेली आहे. तथापि, विकासक मे.सुर्या डेव्हलपर्स यांनी इमारतीचे बांधकाम अद्यापही सुरु केलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.
(४) विकासकास पुनर्वसन इमारतीच्या जोत्यापर्यंतच्या बांधकामास परवानगी दिली आहे. सद्य:स्थितीत विकासकाने विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ च्या अनुषंगाने एकत्रिकरणाच्या सुधारित आशयपत्रासाठी प्रस्ताव सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुर्तीजापूर (जि.अकोला) येथे अवैध गुटखा जप्त केल्याबाबत

(२६) ३३५६२ (०७-०१-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुर्तीजापूर (जि.अकोला) येथे विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र यांचे विशेष पथकाने दिनांक २५ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास छापा टाकून राज्यात प्रतिबंधित असलेला ४५ लक्ष रुपयांचा अवैध गुटखा जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर छापा प्रकरणी चार गुटखा माफियांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, गुटखा माफियांना पाठशी घालण्याऱ्या स्थानिक ठाणेदार, मुर्तीजापूर यांचेवर व संबंधित आरोपींवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) होय.

रूपये ४३.२८ लाख किंमतीचा अवैध गुटखा जप्त केला.

(२) व (३) प्रकरणी २ आरोपींविरुध्द पोलीस स्टेशन, मुर्तिजापूर शहर, जि. अकोला येथे अप.क्र.४३५/२०२१ कलम २७२, २७३, ३२८ भा.दं.वि. सहकलम २६ (२), ५९, अन्न सुरक्षा मानके कायदा, २००६ अन्वये गुन्हा नोंद करुन आरोपीस अटक करण्यात आली आहे.

(४) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, मुर्तीजापूरचे तत्कालीन ठाणेदार पोलीस निरीक्षक यांचेविरुध्द प्राथमिक चौकशी सुरु असुन, पुढील कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला शहरात शस्त्रांचा धाक दाखवून दहशत पसरविनाण्यांवर कारवाई करण्याबाबत

(२७) ३३५६३ (०७-०१-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरात शस्त्राचा धाक दाखवून दहशत पद्यरविल्याचे डाबकी रोड पोलीस स्टेशन येथे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दहशत माजविणाऱ्या गुंड प्रवृत्तीच्या इसमांकडून गावठी पिस्तुल व जिवंत काडतुसे असा २०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील पाच वर्षात किती गुन्ह्यांची नोंद केली असून नागरिकांना दहशत मुक्त करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) :(१) दि.२६.१०.२०२१ रोजी शस्त्राचा धाक दाखवून दहशत पसरविण्याचा गुन्हा घडणार अशी बातमी गुप्त बातमीदाराकडून मिळाल्यानंतर आरोपीस अवैध शस्त्रासह ताब्यात घेण्यात आले आहे.

(२) सदर प्रकरणी आरोपीकडून एक पिस्टल, जिवंत काडतूसे असा एकूण रु. १५५००/- इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन, डाबकी रोड येथे गु.र.नं. ६९२/२०२१ कलम ३, २५ आर्म ॲक्ट सह कलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(३) अकोला जिल्हयात मागील पाच वर्षात अवैद्य अग्नीशस्त्र प्रकरणी ३७ गुन्हे दाखल करण्यात आले असून जप्त अग्नीशस्त्रे व काडतुसे असा एकूण रु. ११,६४,९५०/- इतक्या रक्कमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमांविरुध्द विशेष मोहिमेचे आयोजन करुन प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील आठ गावांचा विदयुत पुरवठा खंडीत करण्यात आल्याबाबत

(२८) ३३५६५ (१२-०१-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील आठ गावांचा विदयुत पुरवठा माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान खंडीत करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु गावांचा वीज पुरवठा खंडीत करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन खंडीत केलेला वीज पुरवठा नियमित सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे. मेहकर तालुक्यातील आठ गावांचा विज पुरवठा खंडित केलेला नसून ११ के.व्ही. नागझरी कृषी वाहिनी वरील पोल तुटल्यामुळे सदरील गावांतील फक्त कृषीपंपाचा वीजपुरवठा बंद होता.

(२) दि.२७.१०.२०२१ रोजी सकाळी ६.०० वाजे दरम्यान झालेल्या जोराचा पाऊस व वादळी वाऱ्यामुळे ११ के.व्ही. नागझरी कृषी वाहिनीवरील पोल तुटल्यामुळे ११ के.व्ही. नागझरी कृषी वाहिनीवरील ८ गावातील कृषीपंपाचा वीज पुरवठा हा जवळपास १९ तास बंद होता.

(३) दि.२८.१०.२०२१ रोजी ११ के.व्ही. नागझरी कृषी वाहिनीचा तुटलेला पोल बदलविण्यात आला व त्यावरील सर्व गावांचा वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नायगाव(जि.नांदेड) तालुक्यात शेतकऱ्यांना विदयुत रोहित्र दुरुस्त करुन देण्याबाबत

(२९) ३३६२३ (१२-०१-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (जि.नांदेड) तालुक्यात शेतकऱ्यांना विदयुत रोहित्र नादुरुस्त झाल्यास किंवा जळाल्यास चार ते पाच महीने कालावधीनंतरही दुरुस्त करुन मिळत नसल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्याास, महावितरण कंपनीचे अभियंता विदयुत रोहीत्र दुरुस्त करण्यासाठी लागणारे तेल मिळत नसल्याचे कारण सांगत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदयुत रोहित्र वेळेवर दुरुस्त करुन मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रोहित्र दुरुस्त किंवा नवीन रोहित्र उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) हे खरे नाही.

नायगांव तालुक्यामध्ये ९०४ थ्री फेज रोहित्रे कार्यरत असून सन २०२१-२०२२ (दि.०१.०४.२०२१ ते २८.०१.२०२२ पर्यंत) मध्ये नादुरुस्त झालेल्या १२१ थ्री फेज रोहित्रांपैकी १२० रोहित्रे बदलण्यात आली असून उर्वरित १ रोहित्रे वेळेत दुरुस्त करुन ज्येष्ठता यादीनुसार बदलून देण्यात येतात.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

वाडा (जि.ठाणे) तालुक्यातील वीज वितरण कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभाराबाबत

(३०) ३३७६० (१२-०१-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.ठाणे) तालुक्यातील वीज वितरण कार्यालयातील अधिकाऱ्यांपासून ते कार्यालयीन कर्मचारी, लाइनमन, वायरमन यांच्या मनमानी कारभाराच्या निषेधार्थ दिनांक २५ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास श्रमजीवी संघटनेच्या वतीने महावितरण कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळुन आले, तद्नुषंगाने कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभाराला आळा घालण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी चौकशी केली असता वाडा उपविभाग अंतर्गत कार्यरत मीटर रिडींग एजन्सी मे. कृपा सिंधू यांनी ग्राहकांच्या मीटरचे चुकीचे रिडींग घेतल्याने काही ग्राहकांना चुकीचे वीजदेयक दिले गेले. त्यानंतर सदर एजन्सीचे काम कमी करुन नविन एजन्सीला देण्यात आले आहे.

माहे सप्टेंबर ते डिसेंबर २०२१ या कालावधीत योग्य रिडींग न घेतल्याबाबत मे. कृपा सिंधू या रिडींग एजन्सी कडून रु. १.८४ लक्ष एवढा दंड वसूल करण्यात आला असून, सदर एजन्सी वर वाडा पोलीस ठाणे येथे चुकीचे मीटर वाचन केल्याबद्दल दि.२९.०१.२०२२ रोजी फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

जोगेश्वरी पूर्व उपनगरातील मुंबई येथील मजासगाव येथे के/पूर्व भागातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत

(३१) ३३८२४ (११-०१-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **गृहनिर्माण / उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील उपनगरातील जोगेश्वरी पूर्व येथील मजासगाव येथे महानगरपालिका के/पूर्व भागात किती झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव सादर झालेले आहेत आणि या प्रस्तावाप्रमाणे कोणत्या संस्था/विकासकाच्या योजना प्रत्यक्षात सुरु आहेत व कोणत्या योजना पूर्णपणे बंद आहेत, बंद असलेल्या योजनाबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(२) असल्यास, महानगरपालिका के/पूर्व भागात गत १५ ते २० वर्षात किती झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रत्यक्षात पूर्णत्वास आल्या आहेत आणि या पूर्ण झालेल्या योजनांमध्ये किती संस्था/सोसायटी यांना व्यवसाय प्रमाणपत्र (ओसी) प्राप्त झाले आहे,
(३) तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी मुंबई झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना माहे मे, २०१४ पासून पत्र व्यवहार करून १) मौजे वेरावली न.भू.क्र. १ श्यामनगर, २) मौजे मजास न.भू.क्र. १६६, संभाजी नगर, एस.आर.ए. योजना, म्हाडा कॉलनी जवळ अंधेरी (पूर्व) ३) मौजे मजास न.भू.क्र. १७१, १७२, १७३, १७४ व १७५, कोकण नगर, एस.आर.ए. योजना ४) मौजे मजास न.भू.क्र. १७५ पार्ट, त्रिचरण सोसायटी, साईबाबा सोसायटी, कोकण नगर, जोगेश्वरी पूर्व, दुर्गानगर एस.आर.ए. योजना ५) मौजे मजास न.भू.क्र. ६१, ६२ व राधेय सोसायटी, समर्थ नगर

एस.आर.ए. योजना ६) मजासवाडी एस.आर.ए. योजना ७) हरिनगर एस.आर.ए. योजना ८) शिवाजी नगर एस.आर.ए. योजना या योजनांच्या सद्यस्थितीबाबत विचारणा केली हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त सर्व झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची सद्य:स्थिती काय आहे व या प्रकल्पांपैकी किती प्रकल्प पूर्ण झालेले आहेत, पुनर्विकास योजनांच्या पूर्ततेबाबत शासनाची भूमिका काय,
(५) नसल्यास, या प्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत व त्यास जबाबदार असणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करून सदरहू योजना तातडीने पूर्ण करण्याबाबत शासन कोणती कारवाई किती कालावधीत करणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) : (१) जोगेश्वरी पूर्व (मुंबई उपनगर) येथील मजासगाव येथे महानगरपालिका के/पूर्व भागात एकूण ६७ झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव सादर झाले आहेत. त्यापैकी २५ योजना प्रत्यक्षात सुरु आहेत. ११ योजनांना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे. तर ३१ योजना बंद आहेत. बंद/प्रलंबित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. त्यानुसार निविदा प्रक्रियेने विकासकाची नियुक्ती करणे तसेच अभय योजना राबविण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.
(२) महानगरपालिका के/पूर्व विभागात मागील २० वर्षात एकूण ९६ योजना पूर्ण झाल्या असून त्यांना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहेत.
(३) हे खरे आहे.
(४) १) मौजे वेरावली न.भू.क्र.१ श्यामनगर या योजनेचा प्रस्ताव दफ्तरी दाखल करण्यात आला आहे.
२) मौजे मजास न.भू.क्र.१६६, संभाजी नगर, एस.आर.ए. योजना, म्हाडा कॉलनी जवळ अंधेरी (पूर्व)- न.भू.क्र.१६६ वर स्वयंभू साई योजना असून सदर योजनेस आशयपत्र तसेच नकाशे पारित झालेले आहे.
३) मौजे मजास न.भू.क्र.१७१, १७२, १७३, १७४ व १७५, कोकण नगर, एस.आर.ए. योजनेला अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.
४) मौजे मजास न.भू.क्र.१७५ पार्ट, त्रिचरण सोसायटी, साईबाबा सोसायटी, कोकण नगर, जोगेश्वरी पूर्व, दुर्गानगर एस.आर.ए. योजनेचा प्रस्ताव दफ्तरी दाखल करण्यात आला आहे.
५) मौजे मजास न.भू.क्र.६१,६२ व राधेय सोसायटी, समर्थ नगर एस.आर.ए.योजनेचा प्रस्ताव दफ्तरी दाखल करण्यात आला आहे.
६) मजासवाडी एस.आर.ए. योजना प्रगती पथावर आहे.
७) हरिनगर एस.आर.ए. योजना प्रगती पथावर आहे.
८) शिवाजी नगर एस.आर.ए. योजना प्रगती प्रथावर आहे.
विकासकाचे काम रखडले असल्यास महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम १३(२) अनुसार विकासक बदलण्याची कार्यवाही करण्यात येते. तसेच रखडलेल्या योजना मार्गी लावण्याकरिता १) निविदा प्रक्रियेने विकासकाची नियुक्ती करणे. (२) अभय योजना (Amnesty Scheme) राबविणे आदींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याकरिता दि.२५.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे.
(५) प्रश्न उपस्थित होत नाही.

पुण्यातीलवडगाव शेरी मतदार संघातील विद्युत पुरवठ्यांच्या समस्येबाबत

(३२) ३३८९१ (१२-०१-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील वडगांव शेरी या मतदार संघातील विविध भागांमध्ये नागरिकांना वीज पुरवठ्याबाबतच्या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जून, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राजेंद्री नगर भागात गत ५ वर्षांपासून केबल वायर नादुरुस्त झाल्याने दररोज चार तास नागरिकांना वीजे अभावी राहावे लागत असून येथे कायमस्वरुपी केबल लाईन टाकण्यासाठी नागरिकांनी संबंधित विभागातील कनिष्ठ

अभियंता यांचे कडे वारंवार तक्रार करुनही अद्यापही कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) तसेच, नगररोड, विश्रांतवाडी व वडगावशेरी येथील विद्युत सबस्टेशन मध्ये देखील वारंवार तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने उक्त परिसरातील सोसायटी व नागरिकांच्या घरातील वीज पुरवठा सुरळीत होत नसून नागरिकांना विद्युत विभागाचे कर्मचारी खासगी मीटर घेण्यासाठी सक्ती करीत असल्याचे माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राजेंद्री नगर विभागात कायमस्वरुपी केबल बसविण्याबाबत तसेच नगररोड, विश्रांतवाडी व वडगावशेरी येथील विद्युत सबस्टेशन मधील तांत्रिक अडचणी दूर करुन नागरीकांना सुरळीत वीज पुरवठा करुन देण्याबाबत तसेच उक्त प्रकरणी जाणीवपुर्वक दुर्लक्ष करणाऱ्या कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
माहे जून, २०२१ मध्ये अतिवृष्टीमुळे व वादळी वाऱ्यामुळे दोन वेळेस एकूण २ तास ४५ मिनिटे वीज पुरवठा खंडीत झाला होता. सदर सबस्टेशन व विद्युत वाहिनीची दुरुस्तीची कामे त्वरीत केल्यानंतर बिघाड होण्याचे प्रमाण बंद झाले आहे.
(२) माहे जून, २०२१ मध्ये राजेंद्रीनगर भागातील ग्राहकांचा वीज पुरवठा करण्यासाठी नादुरुस्त झालेली केबल बदली करुन नवीन केबल टाकण्यात आली व वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला होता. त्यानंतर आजतागायत वडगाव शेरी उपविभागांतर्गत राजेंद्रीनगर भागात वीज पुरवठयाबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार नागरिकांकडून प्राप्त नाहीत.
(३) हे खरे नाही.
माहे जून, २०२१ मध्ये अतिवृष्टीमुळे व वादळी वाऱ्यामुळे दोन वेळेस एकूण २ तास ४५ मिनिटे वीज पुरवठा खंडीत झाला होता. सदर सबस्टेशन व विद्युत वाहिनीची दुरुस्तीची कामे त्वरीत केल्यानंतर बिघाड होण्याचे प्रमाण बंद झाले आहे. तसेच नगररोड विभागास मुबलक प्रमाणात वीज मिटर देण्यात आले असून महावितरणचे कर्मचारी खासगी मिटर घेण्यासाठी सक्ती करत असल्याची बाब खरी नाही.
(४) राजेंद्रीनगर भागात रस्ते व इतर ठिकाणी खोदकामामुळे भुमिगत वाहिनी नादुरुस्त झाल्या व त्या त्वरीत दुरुस्त करण्यात आल्या परंतु अतिवृष्टीमुळे खोदकाम केलेल्या जागी पाणी साचून आद्रतेमुळे भुमिगत वाहिन्या नादुरुस्त होऊन वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्यामुळे त्या भूमिगत वाहिन्या बदलून त्या ठिकाणी नवीन भुमिगत वाहिन्या टाकण्यात आल्या. तसेच नगररोड, विश्रांतवाडी व वडगावशेरी येथील विद्युत सबस्टेशन मधील सर्व तांत्रिक अडचणी दूर करण्यात आल्या आहेत. याबाबत तपास केला असता त्यामध्ये कोणीही दोषी आढळले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

पापडी(ता.वसई, जि.पालघर) येथील परिसरातील विजेचा खांब पडून विजवाहक तारांचा संपर्क आल्याने एका बालकांचा झालेला मृत्यु

(३३) ३४११७ (१२-०१-२०२२). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) : सन्माननीय उपकेंद्रा **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पापडी (ता.वसई, जि.पालघर) येथील परिसरातील औद्योगिक वसाहतीकडे जाणाऱ्या मार्गावर विजेचा पोल पडल्याने विजवाहक तारांचा संपर्क आल्याने एका सहा वर्षीय बालकांचा विजेचा शॉक लागून जागीच मृत्यू झाल्याची घटना दिनांक २२ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास घडली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन वीजवाहक तारांचा खांब वेळीच न उचलणाऱ्या महावितरणाच्या संबधित अधिकारी व कर्मचाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, शॉक लागून मृत्यू पावलेल्या मुलाच्या कुटूंबीयांना शासनाने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) तौक्ते चक्रीवादळामुळे वसई परिसरात विविध ठिकाणी मोठमोठी झाडे कोलमडून तारा/पोल तुटून अथवा झुकून विद्युत वाहिन्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले होते. विविध ठिकाणी विद्युत पुरवठा सुरळीत करण्याची कामे युध्द पातळीवर सुरु होती व सर्व महावितरणचे अधिकारी, कर्मचारी व सर्व यंत्रणा विज पुरवठा सुरु करण्याच्या कामात व्यस्त होती. सदर घटना ही तौक्ते चक्रीवादळाच्या नैसर्गिक आपत्तीमुळे घडलेली असल्याने महावितरणचे अधिकारी किंवा कर्मचारी या घटनेस जबाबदार नाहीत. सदरील घटनेशी चौकशी विद्युत निरीक्षक, पालघर यांनी केली असता त्यांच्या अहवालानुसार सदरील अपघात हा महावितरणच्या वीज संच मांडणीवर झाला असल्याने मृताच्या वारसास नियमानुसार योग्य ती नुकसान भरपाई देण्याची शिफारस केली आहे.
(३) मृत्यू पावलेल्या मुलाच्या कुटूंबीयांना तातडीची मदत म्हणून रक्कम रु. २०,०००/- दि. २४.०५.२०२१ रोजी रोखीने देण्यात आले. तसेच कंपनीच्या नियमानुसार नुकसान भरपाई देण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर करुन उर्वरित रक्कम रु. ३,८०,०००/- ची आर्थिक मदत वारसांना दि. २२.११.२०२१ रोजी एन. ई. एफ. टी. व्दारे अदा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील जिजामातानगर, काळाचौकी येथील अखिल जिजामातानगर झोपडपट्टी वसाहतीच्या पुनर्विकासाबाबत

(३४) ३४५२९ (१७-०१-२०२२). श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **गृहनिर्माण /उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिजामातानगर, काळाचौकी, येथे ३२ हौऊसिंग सोसायट्या असलेल्या अखिल जिजामातानगर झोपडपट्टी वसाहतीच्या पुनर्विकासाचे काम २० वर्षे होऊनही अद्याप सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर झोपडपट्टी वसाहतीच्या पुनर्विकासाबाबत दिनांक ८ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपु प्राधिकरण, संबंधित अधिकारी व विकासक यांच्या समवेत सोसायटीचे पदाधिकारी यांची संयुक्त बैठक झाली, त्यामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियम अंतर्गत कारवाई करून पुनर्विकास करणा-या विकासकास तात्काळ काढून टाकण्याची मागणी सोसायटीच्या उपस्थित सर्व पदाधिका-यांनी केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अखिल जिजामातानगर झोपडपट्टी वसाहतीच्या पुनर्विकासंदर्भात तात्काळ गृहनिर्माणमंत्री यांनी बैठक बोलवावी असे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १० फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास गृहनिर्माणमंत्री महोदयांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करून सोसायटीच्या पदाधिका-यांच्या मागणीच्या अनुषंगाने विकासकास तात्काळ काढून टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) : (१) परेल शिवडी विभागातील भू.क्र.६/१४८ व इतर या मिळकतीवर जिजामाता सह.गृह.संस्था व इतर ३१ अशा एकूण ३२ सहकारी गृहनिर्माण संस्थाचे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत विकासकाम प्रस्तावित आहे. सदरची योजना दिनांक ०३.०४.१९९८ रोजी स्विकृत झाली आहे. सदर योजनेचे पुनर्विकासाचे काम अद्याप सुरु झालेले नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
दिनांक ०८.०२.२०२१ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडे झोपडीधारकांनी उपस्थित राहून विकासक काम करण्यास दिरंगाई करत असल्याने त्याचे विरुध्द कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ चे कलम १३(२) अंतर्गत कार्यवाही करून योजनेचे विकासक यांना दि.३०.०५.२०२१ रोजीच्या आदेशान्वये काढून टाकण्यात आले

होते. परंतु सदर आदेशाविरुध्द विकासक मे.शांती ओम रेसिडेन्सी प्रा.लि.यांनी शिखर तक्रार निवारण समितीकडे दाद मागितली आहे. शिखर तक्रार निवारण समितीने दि.०५.०८.२०२२ रोजीच्या आदेशान्वये मे.शांती ओम रेसिडेन्सी प्रा.लि. यांना अखिल जिजामाता नगर सह.गृह.संस्था फेडरेशन (नियो) या योजनेचे विकासक म्हणून काही अटी व शर्तींच्या आधारे पुन्हा नियुक्त केले.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

औषधी वनस्पती शेतात लागवड केल्यानंतर विकत घेण्याचे प्रलोभन दाखवून झालेला आर्थिक गैरव्यवहार

(३५) ३४५६५ (०७-०१-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औषधी वनस्पती शेतात लागवड केल्यानंतर ती विकत घेण्याचे प्रलोभन दाखवून पुणे, सोलापूर व रायगड जिल्ह्यातील पाचशेपेक्षा अधिक शेतकऱ्यांची तब्बल २३ कोटी ४५ लाखांना आर्थिक फसवणूक केल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधीत आरोपींना अटक करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) होय.
(२) व (३) सदर प्रकरणी पुणे शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत सहकारनगर पोलीस ठाणे येथे गु.र.नं २३८/२०२१ भा.दं.वि.कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४०६, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमूद गुन्हयाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा पुणे शहर यांनी केला असून गुन्हयातील अटक आरोपी विरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पनवेल शहर विभागातील उरण येथील आईस ॲन्ड चिलिंग कंपनीतील वीजचोरी उघडकीस आणल्याबाबत

(३६) ३४८३४ (१२-०१-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) : सन्माननीय **उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल शहर विभागातील उरण येथील आईस ॲन्ड चिलिंग कंपनीतील १,३६,३४१ युनिटची २० लाख ६० हजार २२० रुपयांची वीजचोरी महावितरण वाशीच्या भरारी पथकाने दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आणली, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कंपनीवर गुन्हा दाखल करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) होय हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी आईस ॲन्ड चिलिंग कंपनीतील आरोपी (वापरकर्ते श्री. अनि जन व गौतम सखराम तनफरे तसेच मालक श्री. शेखर म्हात्रे) यांचे विरुध्द विद्युत अधिनियम २००३, कलम १३५ १३८ अंतर्गत पनवेल शहर नवी मुंबई पोलिस ठाणे येथे दि. ०८.०९.२०२१ रोजी गुन्हा नोंद केलेला आहे. सदर प्रकरणी संबंधित पोलिस ठाण्याकडून पुढील चौकशीची प्रक्रिया सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्ह्यामध्ये चोरट्यांना आळा घालण्याबाबत..

(३७) ३४८७३ (०७-०१-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यामध्ये चोरट्यांना आळा घालण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २७ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार आतापर्यंत किती चोरट्यांना पकडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) होय.

(२) सन २०२१ मध्ये बुलडाणा जिल्हयात दाखल असलेले दरोडा, जबरी चोरी, घरफोडी व चोरी याप्रमाणे मालमत्तेच्या गुन्हयाप्रकरणी २८७ गुन्हयांतील एकूण ७६८ आरोपीतांना अटक करण्यात आलेली आहे. अटक आरोपीतांविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस स्टेशनचे रेकॉर्डवरील निगराणी गुन्हेगार, क्रियाशिल गुन्हेगार यांना नियमित तपासून त्यांचे हालचालीवर लक्ष ठेवून त्यांचे विरुध्द आवश्यकतेनुसार प्रतिबंधक कारवाई करण्यात येते. अचानक विशेष नाकाबंदीचे आयोजन करुन वाहनांची चेकींग करुन गुन्हेगारांकडून मालमत्तेचे गुन्हे घडणार नाही याची दक्षता घेण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्ह्यात काही गैरव्यवहार करणाऱ्या पोलिसांचे रेती माफीयांसोबत संबंध असल्याबाबत

(३८) ३४८९३ (१०-०१-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात काही गैरव्यवहार करणाऱ्या पोलिसांचे रेती माफीयांसोबत संबंध असल्याने रेतीचे अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कारवाईची मोहिम राबविण्याचे आदेश पोलिस अधिक्षक यांनी जिल्ह्यातील सर्व ठाणेदारांना दिल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही, तथापि बुलडाणा जिल्हयामध्ये अवैधरित्या रेती वाहतुक होणार नाही तसेच अवैध रेती वाहतुकीस आळा बसण्याच्या दृष्टीने पोलीस स्टेशन स्तरावर विशेष मोहिमांचे आयोजन करून अवैध रेती वाहतुक करणारे इसम, वाहनांवर छापे टाकुन कारवाई करणेबाबत पोलीस अधीक्षक कार्यालयामार्फत वेळोवेळी सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व सर्व ठाणेदार यांना दरमहा लेखी तसेच तोंडी सुचनेव्दारे आदेशीत करण्यात येते.

बुलडाणा जिल्हयात सन २०२१ मध्ये वाळु माफियांचे विरुध्द छापे टाकुन त्यांचे विरुध्द ४९ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. दाखल गुन्हयांमध्ये एकूण ८० आरोपींना अटक करण्यात आलेले आहेत. तसेच नमुद गुन्हयामध्ये एकूण १०६ ब्रास रेती व साहित्य असा एकूण रु. २,८०,२७,७०६/- इतक्या रक्कमेचा माल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच अवैध रेती वाहतुक करणाऱ्यांवर वेळीच कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोरोना काळात लॉकडाऊनचे निर्बंध शिथिल होऊनही अधिकारी व कर्मचारी लाचखोरीच्या सापळ्यात अडकूनही सरकारी सेवेत असल्याबाबत

(३९) ३४९०४ (०७-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात लॉकडाऊनचे निर्बंध शिथिल झाल्यापासून लाचखोरीच्या सापळयात अडकूनही राज्यातील १८९ अधिकारी व कर्मचारी अद्यापही सरकारी सेवेत आहेत, हे खरे हे काय,
(२) असल्यास, लाचखोरीमध्ये शिक्षा होऊनही ३६ जण हजेरी पटावर आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) व २)

दि.२.८.२०२२ रोजीपर्यंत सापळा प्रकरणांत कारवाई होऊनही अदयापपर्यंत निलंबित न केलेल्या आलोसे यांची अद्यायावत संख्या १९५ एवढी आहे.

दि.२.८.२०२२ रोजीपर्यंत शिक्षा झालेल्या सापळा प्रकरणांत अदयापपर्यंत बडतर्फ न केलेल्या आलोसे यांची अदयावत संख्या २२ एवढी आहे.

(३) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सापळा प्रकरणातील आरोपी लोकसेवकांविरुध्द कारवाई पूर्ण होऊन त्यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर त्वरीत संबंधित लोकसेवकांच्या प्रशासकीय विभागास कळविण्यात येते. त्यानुसार प्रशासकीय विभागामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येते.

मुख्यसचिव यांच्या अध्यक्षतेखाली वेळोवेळी बैठका आयोजित करुन मंत्रालयीन स्तरावर संबंधित विभागांना प्रलंबित प्रकरणाबाबत आढावा घेऊन कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही

वसमत तालुक्यातील (जि.हिंगोली) महावितरणाच्या नादुरुस्त असलेल्या रोहित्र व ३३ केव्ही उपकेंद्रांच्या समस्यांबाबत

(४०) ३४९४५ (१२-०१-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमत विधानसभा मतदार संघातील प्रलंबित कामांबाबत मंत्रालय, मुबंई येथे दिनांक ६ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास आढावा बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बैठकीत वसमत येथील लोकप्रतिनिधीनी वसमत तालुक्यात महावितरणाच्या नादुरुस्त असलेल्या रोहित्र व ३३ केव्ही उपकेंद्रांच्या समस्यांबाबत तसेच येणाऱ्या रब्बी हंगामातील वाढती विजेची मागणी लक्षात घेऊन रोहित्रे नादुरुस्त होणार नाहीत याबाबत विनंती केली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रमाणे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) हे खरे आहे.

वसमत विधानसभा मतदारसंघातील महावितरणच्या प्रलंबित कामाबाबत मंत्रालय, मुंबई येथे दिनांक ५ ऑक्टोबर, २०२१ रोजी मा. मंत्री (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली.

(२) हे खरे आहे.

माहे एप्रिल-२०२१ ते दि. २८.११.२०२१ पर्यंत वसमत विधानसभा मतदारसंघात २५९ वितरण रोहित्र नादुरुस्त झाले आहेत. त्यापैकी २४१ वितरण रोहित्र बदलण्यात आले आहेत. उर्वरित १८ वितरण रोहित्र उपलब्धतेनुसार व ग्राहकांनी

त्यांच्या वीज बिलाचा भरणा केल्यावर बदलण्यात येतील. तसेच रब्बी हंगामातील वाढती विजेची मागणी व रोहित्रांची आवश्यकता लक्षात घेता वसमत तालुक्यासाठी नवीन २० वितरण रोहित्र उपलब्ध करण्यात आले आहेत.
(३) लोकप्रतिनिधीच्या मागणी नुसार वसमत येथे गाळणी कक्षाकरिता कर्मचाऱ्यांची नियुक्ती करुन सदर कक्षाचे कामकाज पुनश्च कार्यान्वित करण्यात आले आहे. तसेच ३३ केव्ही पोटा शेळके, जलालधाबा ता. औंढाना व मौजे मुडी आणि आसेगाव ता. वसमत येथील नवीन उपकेंद्र तसेच वाई वाखारी येथील उपकेंद्रात अतिरिक्त पॉवर ट्रान्सफार्मर उभारण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. प्रस्तावाच्या तांत्रिक पडताळणीनंतर व केंद्र शासनाच्या मान्यतेनंतर आर्थिक व्यवहार्यता तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच अंतर्गत पदस्थापनेव्दारे उपलब्धतेनुसार शाखा अभियंता यांची रिक्त पदे भरण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील विजेच्या समस्यांबाबत

(४१) ३५०५८ (१२-०१-२०२२). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील विजेच्या समस्या सोडविण्याच्या अनुषंगाने करंजगाव, भेंडाळी येथे ५ एम.व्ही.ए. चे २ ट्रान्सफार्मर, तामसवाडी येथे १३२ के व्ही चे उपकेंद्र, चाटोरी येथे ३३ के व्ही चे उपकेंद्र तसेच एचएएल, दिक्षी येथे ३३ के.व्ही चे उपकेंद्र मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मार्च २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मा.मंत्री, ऊर्जा यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने ने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) होय हे खरे आहे.
(२) ३३/११ के.व्ही. करंजगाव व भेंडाळी येथील उपकेंद्रामध्ये ५ एमव्हीए क्षमतेचे प्रत्येकी एक अतिरिक्त रोहीत्र उच्चदाब वितरण प्रणाली (HVDS II) योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेले आहे. सदर उपकेंद्राचे काम प्रगतीपथावर असून जानेवारी २०२३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. चाटोरी येथील ३३/११ के.व्ही. उपकेंद्राऐवजी कृषी धोरण, २०२० अंतर्गत दारणासांगवी येथे नवीन ३३/११ केव्ही उपकेंद्र (२x५ एमव्हीए) तसेच दिक्षी येथील उपकेंद्रातील ११ के.व्ही. दिक्षी वाहिनीचा भार कमी करण्यासाठी सदर वाहिनीचे विभाजन करुन नवीन ११ के.व्ही. वाहिनी उभारणीचे नियोजन करण्यात आले आहे. ओझर HAL येथे १३२/११ के.व्ही. ४५ एमव्हीचे उपकेंद्र पूर्वीपासून कार्यान्वित असून त्यावरील महत्तम भार २० एमव्हीए इतका आहे. तामसवाडी येथील १३२ उपकेंद्राबाबत तांत्रिक सुसाध्यता पडताळणी क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे व सदर प्रस्तावाची तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता तपासून पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

तौक्ते वादळामुळे राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात पडलेले वीजेचे खांबा कायमस्वरुपी बदलण्याबाबत

(४२) ३५०९७ (१२-०१-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय ऊर्जा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तौक्ते वादळामुळे राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात माहे जून-जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान वीज खांब कोसळून मोठी हानी झाली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त वीजेच्या खांबाना महावितरणाकडून तात्पुरत्या स्वरुपात दकडाचा टेकू लावून वीजेचे खांब उभे केले जातात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त वीजेचे खांब तात्पुरत्या स्वरुपात दुरुस्त केले असल्याने वारंवार पडत असल्याने तेथील नागरिकांना वीज गेल्याने अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लवकरात लवकर वीजेचे खांब कायमस्वरुपी दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
दि.१६ मे, २०२१ रोजी झालेल्या तौक्ते वादळामुळे राजापूर तालुक्यातील उच्चदाब व लघुदाब वाहिनीचे एकूण ३१७ पोल त्यावरील वाहिनीसह पडले/बाधित झाले होते. तसेच इतर अनेक ठिकाणी उच्चदाब व लघुदाब वाहिनीच्या तारा तुटून त्याठिकाणचा वीजपुरवठा खंडीत झाला होता.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) पडलेल्या सर्व पोल व वीजवाहिन्यांची कायमस्वरुपी दुरुस्ती करण्यात आली होती.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

बीड जिल्हयातील शेतीपंपाच्या ट्रान्सफॉर्मरच्या अडचणी सोडवणेबाबत

(४३) ३५११९ (१२-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हयात शेतीपंपाचा ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त झाला की शेतक-याला कप्पी भाड्याने आणावी लागत असून त्यासाठी भाड्याने वाहन करुन ट्रान्सफॉर्मर घेऊन जावा लागत असल्याने वेळेचा अपव्यय व पैशाचा आर्थिक भुर्दंड शेतकऱ्यांना सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरण तर्फे नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर काढणे व दुरुस्त ट्रान्सफॉर्मर वाहतुक करुन बसविण्यासाठी (कप्पीसह) निविदा काढल्यास शेतक-याला मदत होईल, हेही खरे आहे काय,
(३) तसेच बीड जिल्हयात प्रत्येक तालुक्यात कॉन्ट्रक्टर च्या दोन तांत्रिक बाबी पाहणाऱ्या व्यक्ती नेमाव्यात अशी विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींकडून उर्जामंत्री यांना केली आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, बीड जिल्हयातील शेतक-यांना शेतीपंपाच्या ट्रान्सफॉर्मरच्या अडचणी सोडवण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
नादुरुस्त रोहित्र काढणे व पुन्हा दुरुस्त रोहित्र बसविण्याचे काम महावितरणतर्फे करण्यात येते.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) हे खरे आहे.
(४) रोहित्र दुरुस्त करणे, नादुरुस्त रोहित्र काढणे व पुन्हा दुरुस्त रोहित्र बसविण्याचे काम महावितरण तर्फे करण्यात येते. तसेच रोहित्र दुरुस्तीसाठी बीड विभागात २६ एजन्सी व अंबाजोगाई विभागात २३ एजन्सीची नेमणूक करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

केज (जि.बीड) विधानसभा मतदार संघातील विजेच्या विविध प्रश्नांबाबत

(४४) ३५१२३ (१२-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि.बीड) येथील विधानसभा मतदार संघातील ९ (नऊ) ३३ केव्ही उपकेंद्रास निधी मिळावा, ३३ केव्ही

उपकेंद्रत ५ एमव्ही चे अतिरिक्त ट्रान्सफार्मर बसविणे तसेच विजे संबंधी विविध कामे तातडीने करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ऊर्जा मंत्री यांना दिनांक २८ मे, २०२१ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी करुन वरील कामापैकी किती कामे करण्यात आली असून त्यानुसार एकूण किती रुपये खर्च करण्यात आले वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) होय हे खरे आहे.
(२) ता. केज जि. बीड मतदारसंघातील लोकप्रतिनिधींनी मागणी केलेल्या दोन नवीन ३३/११ केव्ही मगरवाडी व पोखरी रोड ही उपकेंद्रे तसेच होळ (ता.केज) अपेगांव (अंबेजोगाई), येळंबघाट (ता.बीड) या तीन उपकेद्रांमध्ये अतिरिक्त रोहित्र बसवण्याचा तांत्रिक प्रस्तावांचा समावेश RDSS (वितरण क्षेत्र सुधारणा योजना) योजने अंतर्गत करण्यात आला आहे. तसेच नवीन ३३/११ केव्ही उंदरी उपकेंद्र आणि कुंभेफळ (ता.केज) या उपकेंद्रामध्ये अतिरिक्त रोहित्र बसविणेबाबतचा तांत्रिक प्रस्ताव मंडळ कार्यालय स्तरावर कृषी धोरण २०२० योजनेअंतर्गत तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. कृषी आकस्मिकता निधीच्या (ACF) उपलब्धतेनुसार सदर कामे हाती घेण्याचे नियोजित आहे. निधी उपलब्ध झाल्यानंतर उर्वरित मागणी केलेल्या नवीन उपकेंद्र व अतिरिक्त रोहित्र बसवण्याच्या प्रस्तावांची, तांत्रिक सुसाध्यता पडताळणी मंजूरीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, तांत्रिक प्राधान्य क्रमानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

टाकळी वतपाळ (ता. नांदुरा, जि. बुलढाणा) या गावातील विद्युत खांबाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(४५) ३५१५२ (११-११-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टाकळी वतपाळ (ता. नांदुरा, जि. बुलढाणा) या गावाचे पुनर्वसनाचे काम पूर्ण झाले असून सदरहू गावातील विद्युत खांबाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने ग्रामस्थांनी आमरण उपोषण करण्याचा इशारा लेखी स्वरूपात जिल्हाधिकारी बुलढाणा यांचेकडे दिनांक २१ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने विद्युत खांबांचे निकृष्ट दर्जाचे काम केल्या प्रकरणी दोषी असलेल्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
ग्रामपंचायत सदस्य, टाकळी वतपाळ यांचे उपोषण करण्याची तक्रार वजा निवेदन जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या कार्यालयास दि.३०.०७.२०२१ रोजी प्राप्त झालेले आहे.
(२) होय.
जिगांव प्रकल्पांतर्गत पुनर्वसन गावठाण,मौजे टाकळी वतपाळ ता.नांदुरा जि.बुलडाणा येथे उच्च दाब, निम्न दाब वीजवाहिनी व रोहित्र उभारावयाचे काम ही विद्युत कामे डीडीएफ (Dedicated Distribution Feeder) या योजनेअंतर्गत कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, अकोला यांचे मार्फत संबंधित महावितरण विभाग, मलकापूर यांच्या निरीक्षणाखाली पूर्ण करण्यात आलेली आहेत.
सरपंच, ग्रामपंचायत टाकळी वतपाळ व माजी उपसभापती, पंचायत समिती, नांदुरा यांनी टाकळी वतपाळ गावठाण परिसरामध्ये जोरदार पाऊस व वारा होऊन ३५-४० पोल पडल्याने, विद्युत पोलचे काम निकृष्ठ झाले असल्याबाबत दि.२२.०६.२०२१ रोजी कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, अकोला यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केला.

त्याअनुषंगाने, कार्यकारी अभियंता यांनी क्षेत्रिय पाहणी केली असता, सदर तक्रारीत सत्यता असल्याचे आढळून आल्याने, विद्युत खांब कंत्राटदारामार्फत तात्काळ बदलण्यात आले. तद्नंतर सरपंच, ग्रामपंचायत टाकळी वतपाळ व इतर ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत या कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली असता, ठेकेदाराकडून लावण्यात आलेले विद्युत पोल चांगल्या दर्जाचे असून वापरण्यात आलेल्या विद्युत पोलचे साहित्य व दर्जा गुणवत्तापूर्ण असून आता आमची कुठलीही तक्रार नसल्याचे सरपंच, ग्रामपंचायत टाकळी वतपाळ व माजी उपसभापती पंचायत समिती, नांदुरा यांनी कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग,अकोला यांना दि.१४.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले.

तद्नंतर, ग्रामपंचायत सदस्या, ग्रामपंचायत, टाकळी वतपाळ यांचा विद्युत पोलचे काम निकृष्ठ झाल्याबाबतचा तक्रार अर्ज दि.३०.०७.२०२१ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाला होता. तथापि अर्ज प्राप्त होण्यापूर्वीच कंत्राटदारामार्फत वीज खांब बदलण्यात आले होते. तद्नंतर उक्त ग्रामपंचायत सदस्या यांचे पती यांनी दि.१९.०१.२०२२ रोजी पुन:श्च तक्रार अर्ज देऊन, दि.२५.०१.२०२२ पासून उपोषण करणार असल्याचा इशारा दिलेला होता. तथापि क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून त्यांच्या शंकांचे निरसन केल्यानंतर त्यांनी दि.२२.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, कामाबाबत कुठलीही तक्रार नसल्याचे व विद्युत खांब गुणवत्तापूर्वक असल्याची खात्री झाल्याचे कळविलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

विद्युत पोलमधील विद्युत प्रवाहाचा शॉक लागून दुर्दैवी मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांस आर्थिक सहाय्य मिळणेबाबत

(४६) ३५१७० (१२-०१-२०२२). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ. औरंगपुर (ता. शिरुर कासार.जि.बीड) येथील शेतीतील विदयुत खांब ताणला जाऊन वाढत्या विदयुत प्रवाहामुळे शेतीकामासाठी शेतात गेलेल्या श्री. अनिल बबन लेईने, यांचा दिनांक २ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास वीजेचा शॉक लागून दुर्दैवी मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या धोरणानूसार मृताच्या कुटूंबियांना आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी संबंधीत लेईने कुटूंबियांनी महावितरण कंपनीच्या बीड येथील स्थानिक अधिकाऱ्यांकडे अनेकदा अर्ज करुन व लोकप्रतिनिधींनी देखील अधिकाऱ्यांच्या वेळोवेळी निदर्शनास आणून तसेच दि. २६ ऑक्टोबर, २०२१ रोजी ऊर्जा राज्यमंत्री यांना निवेदनपत्र देऊन देखील अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यांत आली नसल्याचे दि. ३० ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित लेईने कुटूंबियांना नियमानुसार आर्थिक सहाय्य मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.
सदर घटना ही दि. ०२ ऑक्टोबर, २०२१ रोजी घडली आहे. सदर घटनेच्या वेळेस मौजे औरंगपूर, ता. शिरुर कासार, जि. बीड येथील गावठाण करिता असलेले रोहित्र वीज बिलाच्या थकबाकीमुळे महावितरण कंपनीकडून बंद करण्यात आले होते. परंतु, त्याच परिसरात कृषी पंपाकरिता उभारलेल्या रोहित्राचा येथील वीजपुरवठा सुरु होता. घटनेच्या दिवशी कृषीपंपाकरिता असलेल्या रोहीत्रावरील मध्यमदाब वाहिनीच्या संवाहकावर थेट हुक टाकुन अनधिकृतरित्या व धोकादायक स्थितीत वीजसंचमाडणी हाताळताना श्री. अनिल बबन लेईने यांना विजेचा धक्का लागून ते गतप्राण झाल्याचे निष्पन्न होते. तसेच, घटना स्थळावरील वस्तुनिष्ठ पुराव्यांवरुन सदर शेतीतील विद्युत खांबाच्या तणाव तारामध्ये विद्युत प्रवाह उतरला नसल्याचे देखील चौकशीतून स्पष्ट होत असल्याबाबतचा अहवाल विद्युत निरीक्षक, बीड यांच्याकडून प्राप्त झाला आहे.

(२) संबंधित मयताच्या कुटुंबियांना शासन नियमानुसार आर्थिक मदत मिळण्याबाबतचे पत्र लोकप्रतिनिधी यांनी मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांना पाठविले असून, त्याची प्रत अधिक्षक अभियंता, महावितरण, बीड व कार्यकारी अभियंता महावितरण, बीड यांना अग्रेषित केलेली आहे.
(३) सदरहू अपघातास महावितरण प्रत्यक्षपणे जबाबदार नसल्याने मयताच्या कायदेशीर वारसास कुठल्याही प्रकारची नुकसान भरपाई महावितरण कंपनीतर्फे देय होत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यातील ३८ शेतकऱ्यांनी सन २०१७ मध्ये मोटार पंपाचे पैसे भरून देखील त्यांना वीज जोडणी देण्यात आली नसल्याबाबत

(४७) ३५२१७ (१७-०१-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदुरा (जि. बुलढाणा) तालुक्यातील ३८ शेतकऱ्यांनी मोटर पंपासाठी वीज जोडणी मिळावी यासाठी सन २०१७ मध्ये पैसे भरून देखील अद्याप त्यांना वीज जोडणी देण्यात आली नसल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास महावितणास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच या यासंदर्भात दोषी असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) होय हे अंशत: खरे आहे. सदर निवेदन दिनांक ०९.०९.२०२१ रोजी उपविभाग नांदुरा येथे प्राप्त झाले आहे.
(२) सदर प्रकरणी उपरोक्त ३८ शेतकऱ्यांपैकी ६ अर्जदारांना उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत वीज जोडण्या देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. उर्वरित ३२ पैकी १८ अर्जदारांचे वीज जोडणीसाठी अस्तित्वात असलेल्या विद्युत वाहिनी पासून ६०० मीटर पेक्षा जास्त अंतर असल्याने, शासन निर्णय दि. १८.०६.२०१९ नुसार कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच वीज जोडणीकरिता इच्छूक नसलेले ७ अर्जदार व उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत वाहिनी उभारणीसाठी अडथळा असणारे ७ अर्जदार अशा विविध कारणास्तव वीज जोडणीसाठी प्रलंबित आहेत.
उपरोक्त प्रलंबित असलेल्या ३२ अर्जदारांना वीज जोडणी देण्याच्या हेतुने कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अचलपूर विभागाचे विभाजन करुन नवीन दर्यापूर विभाग निर्माण करण्याच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत

(४८) ३५२७२ (१२-०१-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अचलपूर विभागाचा भौगोलिक आकार विस्तृत असुन या विभागा मार्फत ७ उपविभागीय कार्यालये,४० वितरण केंद्र ३९ उपकेंद्र कार्यरत असून सदर विभागात विज ग्राहकांची संख्या २,००,१६८ इतकी असुन विभागाचे भौगोलिक क्षेत्र मोठे असल्याने कामाचा व्याप अतिशय जास्त असून ग्रामीण तसेच शहरी भागात विदयुत प्रणालीवर परीणाम होऊन ग्राहकांच्या तक्रारी दिवसेंदिवस वाढत असून वेगवेगळया योजने अंतर्गत कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मे. क्रिसील मानकांनुसार विभागीय कार्यालया करीता १,००,००० विज ग्राहकांच्या प्रमाणात ४ ते ६ उपविभागीय कार्यालये असल्यास नवीन विभागीय कार्यालये निर्माण करता येईल अशी तरतुद असून दर्यापूर उपविभागीय कार्यालयात १० तक्रार निवारण केंद्रे असुन ४९,३३४ विज ग्राहक आहेत तसेच अंजनगाव उपविभागीय कार्यालयात ९

तक्रार निवारण केंद्रे असुन ४३,०२७ विज ग्राहक आहेत. दर्यापूर उपविभागाचे विभाजन करुन दर्यापूर उपविभाग क्र. १, दर्यापूर उपविभाग क्र. २ आणि अंजनगाव उपविभागाचे विभाजन करुन अंजनगाव उपविभाग क्र. १, अंजनगाव उपविभाग क्र. २ निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अचलपूर विभागाचे विभाजन करुन नवीन दर्यापूर विभाग निर्माण करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
अचलपूर विभागाची सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या वीज ग्राहकांची संख्या २,०९,८११ इतकी आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.
महावितरणच्या दि. ०४.११.२०१० रोजीच्या कार्यालयीन आदेशातील मानंकाप्रमाणे विभागीय कार्यालयाचे विभाजन करण्याकरिता २,४०,००० पेक्षा जास्त व नव्याने विभागीय कार्यालय निर्माण करण्याकरिता १,२०, ००० पेक्षा जास्त वीज ग्राहक संख्या असणे आवश्यक आहे. तसेच नवीन उपविभागीय कार्यालयाचे विभाजन करण्याकरिता ६०,००० पेक्षा जास्त व नव्याने उपविभागीय कार्यालय निर्माण करण्याकरिता ३०, ००० पेक्षा जास्त ग्राहक संख्या असणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत महावितरण कंपनीच्या आर्थिक दायित्वाचा विचार करुन दर्यापूर विभाग निर्माण करणेची बाब महावितरणस्तरावर विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

दर्यापूर व अंजनगाव सुर्जी शहरातील RAPDRP TOWN अंतर्गत उच्चदाब वाहीनी भूमीगत करण्याबाबत

(४९) ३५२७६ (१२-०१-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दर्यापुर व अंजनगाव सुर्जी या RAPDRP TOWN असलेल्या शहरात महावितरणच्या उच्च दाब विदयुत वाहिन्या या भुमिगत नसल्याने अपघात होत असल्याची बाब माहे जून २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उक्त शहारातील उच्च दाब विदयुत वाहिन्या ह्या भुमिगत करणे तसेच लघु दाब वाहिन्याकरीता ABC केबल वापरणे आवश्यक आहे, हे ही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने तपासणी करुन विदयुत वाहिन्यामुळे होणारे अपघात टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.
दर्यापूर व अंजनगाव सुर्जी या RAPDRP शहर असलेल्या शहरात महावितरणच्या उच्चदाब विद्युत वाहिन्या या भुमिगत नसल्याने अपघात होत असल्याची बाब माहे जुन २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली नाही.
दर्यापूर व अंजनगाव सुर्जी उपविभागाअंतर्गत घरावरुन गेलेल्या विद्युत वाहिन्यामुळे होणारे संभाव्य अपघात टाळण्यासाठी वाहीन्या स्थानांतरीत करण्याकरिता सन २०२०-२१ वर्षाकरिता विशेष घटक योजना (DPDC_SCP) अंतर्गत अचलपूर विभागाकरिता एकूण १५० लक्ष रुपयांचा निधी प्राप्त झालेला आहे. सदर योजने अंतर्गत कामे कंत्राटदारास देण्यात आलेली असून कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच दर्यापूर व अंजनगाव सुर्जी अंतर्गत सुर्जी अंतर्गत उर्वरित उच्चदाब वाहीन्या भुमिगत करण्यासंदर्भात व लघुदाब वाहीन्याच्या ठिकाणी AB केबल टाकण्याकरिता स्थळ परिक्षण व अंदाजपत्रक तयार करण्याचे कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे वाडे (ता.भडगांव जि.जळगांव) येथे नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्राच्या उभारणीबाबत

(५०) ३५३०९ (१२-०१-२०२२). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाडे (ता.भडगांव, जि.जळगांव) येथे नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्राच्या उभारणीच्या प्रस्तावांची तांत्रिक सुसाध्यता तपासणी काम सुरु आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर प्रस्तावित ३३/११ के.व्ही. उपकेंद्राच्या उभारणीची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, ३३/११ के.व्ही उपकेंद्राची उभारणी लवकरात लवकर करण्याबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) जळगाव परिमंडळाअंतर्गत मौजे वाडे, (ता.भडगाव जि.जळगाव) येथे नवीन ३३/११ के.व्ही. (१ x ५ एमव्हीए) उपकेंद्राच्या उभारणीचा तांत्रिक प्रस्ताव कृषी वीज धोरण-२०२० अंतर्गत अधीक्षक अभियंता, जळगांव मंडळ कार्यालयाकडून सांघिक कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदर उपकेंद्राची तांत्रिक सुसाध्यता पडताळणी मंजूरीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

(३) सदर प्रस्तावाच्या तांत्रिक सुसाध्यता पडताळणी मंजूरीची प्रक्रिया पूर्ण झाली असून, सदर नवीन उपकेंद्राचे काम शासनाच्या कृषी वीज धोरण-२०२० योजनेअंतर्गत कृषी आकस्मिक निधीच्या उपलब्धतेनुसार क्षेत्रिय कार्यालयाच्या स्तरावर प्राधान्याने हाती घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.